दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार, दि. १२ऑक्टोबर२०२४ | वर्षे४रे | अंक७०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

### आत्मदहन करण्याचा प्रयत्न

औरंगाबाद:राज्याचे पणन, अल्पसंख्याक मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयात गुरुवारी दुपारी पाच तरुणांनी डिझेल अंगावर ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या पाच तरुणांपैकी एकाला छत्रपती संभाजीनगरमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. आदिवासी कोळी समाजप्रश्नी आश्वासन देऊनही पाळले नसल्याचा आरोप करत तरुणांनी आत्मदहनाच्या प्रयत्नासारखे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती पुढे येत आहे. राजू दांडगे, दीपक सूरडकर (उंडणगाव), रवींद्र इंगळे, सीताराम पाडळे, दयानंद शेवाळे, दिनेश तांबे, अशी आत्मदहन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणांची नावे असून, यातील एकाला छत्रपतीस संभाजीनगरला हलवण्यात आले आहे, अशी माहिती सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेषराव उदार यांनी दिली.पाचपैकी दोन तरुणांनी विष प्राशन केल्याची चर्चा सुरू होती.

# बीडचे एसपी जातीय द्वेषातून काम करतात?

## दसरा मेळाव्याला परवानगी मंग आंबेडकरी जनतेच्या शांतता रॅलीला का नाही!



**बीड पोलीस अधीक्षकांच्या विरोधात पोलीस महासंचालकांना तक्रारीचे पत्र**

**आंबेडकरी जनता पोलीस अधीक्षकांच्या विरोधात कोर्टात धाव घेणार**

**सलोखा बिघडला तर पोलीस अधीक्षक जबाबदार राहतील**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडच्या रेल्वे स्टेशन भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आहे. त्या नावाची नोंद राज्य आणि केंद्र सरकारने करून घ्यावी. या मागणीसाठी बीडचा आंबेडकरी समाज शांतपणे रस्त्यावर उतरला आहे. त्या अनुषंगाने १४ ऑक्टोबर रोजी शांतता रॅली काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले जाणार आहे.परंतु बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी आंबेडकरी जनतेच्या शांतता रॅलीला परवानगी नाकारली आहे. त्यामुळे सामाजिक सलोखा बाधित होण्याचे काम बीडचे पोलीस अधीक्षक करत आहेत.शांतता राहिलेला परवानगी देऊन बीड पोलीस अधीक्षक यांचे तातडीने निलंबन करावे, अथवा त्यांची बीड जिल्ह्यातून बदली करावी अशा तक्रारींचे पत्र मुंबई, पुणे,सोलापूर, नागपूर, औरंगाबाद या ठिकाणाहून पोलीस महासंचालक यांना देण्यात आले आहेत.


**बीडच्या एसपींना एवढी एलर्जी का?**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे सर्वांच्याच सतरा पिढ्यांची कल्याण झाले. मग या महामानवाच्या नावासाठी निघालेल्या आंदोलनास बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना एवढी अलर्जी का आहे. जिल्ह्यात अन्य कार्यक्रमांना परवानग्या देता मोठा पोलीस फौजफाटा पुरविता. मग शांततेत निघणाऱ्या आंबेडकरी जनतेच्या शांतता रॅलीला परवानगी का नाकरता, असा सवाल आंबेडकरी जनतेने उपस्थित केला.

पोलीस महासंचालक यांना देण्यात आले आहेत. तक्रार पत्रात म्हटले आहे. बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बीड शहरातील सर्व जनतेने दिले होते.त्यानंतर बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नाव असलेले बॅनर व फोटो असलेला नीळा झेंडा ओढून फाडून काढला त्या विरोधात बीड जिल्ह्यातील जनतेने दि.९ ऑक्टोबर रोजी मोर्चा काढण्याची रीतसर परवानगी मागितली पान २ वर...

### बीड एसपींच्या विरोधात आंबेडकरी समाज कोर्टात जाणार

संविधानिक मार्गाने प्रत्येकाला त्याच्या अधिकारासाठी मोर्चे, आंदोलने करण्याचा हक्क संविधानाने दिला आहे. असे असताना त्या अधिकारावर बीडचे पोलीस अधीक्षक गदा आणत आहेत. त्यामुळे बीड एसपी विरोधात आंबेडकरी समाज कोर्टात जाणार आहे. पोलिसांनी परवानग्या नाकारून समाजाच्या भावना दुखवू नयेत कारण त्याचे दूरगामी परिणाम होतात. सामाजिक सलोक्याला ठेच पोहोचते ही गोष्ट पोलीस अधीक्षक यांच्या लक्षात येत नसेल तर एवढी जातीय भूमिका योग्य नाही. असा सवाल आंबेडकर जनतेने उपस्थित केला आहे.



## राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मगावी शक्तीचा सगम

### आवाहन:पंकजाताई मुंडेंच्या दसरा मेळाव्याला लाखोंचा जनसागर

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मगांवी सावरगांव येथे उद्या १२ तारखेला भक्ती आणि शक्तीचा विराट संगम पहायला मिळणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या पारंपारिक दसरा मेळाव्याला लाखोंचा जनसागर उसळणार आहे. दरम्यान, दसरा मेळाव्याची परंपरा पुढे सुरू ठेवण्यासाठी शांततेत, वाहने हळू चालवत, घरची भाकरी, चटणी शिदोरी आणि पाण्याची बाटली घेऊन स्वतःची काळजी घेत भगवान भक्तीगडावर वेळेत या, असं आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडेयांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.

पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियात एक व्हिडिओ जारी करून सर्वांना या मेळाव्याला येण्याचे आवाहन करतांना काही सूचना देखील केल्या आहेत. आपल्या कार्यकर्ते व समर्थकांना काळजी पान २ वर...

## म्हणून विकासाला चालना मिळते

### धनंजय मुंडे:लाभार्थींना मंजुरी आदेशाचे मुंडेंच्या हस्ते वितरण



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी मतदारसंघात यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेतून सुमारे ६२०० घरकुलांना एका दिवसात आपण शासनाकडून मंजुरी मिळवली, २०० पेक्ष्या अधिक सिंचन विहिरी दिल्या. नगर परिषद मधून हजारो घरकुले दिली, या सगळ्या बाबी गरजू लोकांसाठी आहेत. या योजनांचा खऱ्या गरजूपर्यंत लाभ पोहोचल्याने विकासाला चालना मिळताना दिसत आहे, असे मत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केले आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने परळी मतदारसंघात दोन शासन निर्णयांच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून सहा हजार दोनशे घरकुले मंजूर करण्यात आली आहेत तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून मतदारसंघात ५०० पेक्षा अधिक घरकुले मंजूर करण्यात आली असून, या घरकुलांच्या मंजुरी आदेशाचे वितरण संबंधित लाभार्थींना ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात धनंजय मुंडे बोलत होते.नगरपालिकेच्या माध्यमातून परळी शहरात प्रधानमंत्री आवास व रमाई घरकुल योजनेच्या माध्यमातून ४ हजार पेक्षा अधिक घरकुलांना मंजुरी दिली यातील जवळपास ३ हजार घरकुले मागील ४ वर्षात उभी राहिली. परळी मतदारसंघात परळी व अंबाजोगाई तालुक्यातील गावे मिळून ३००० पेक्षा जास्त सिंचन विहिरी नरेगामधून मंजूर केल्या, जवळपास २००० शेततळे मंजूर केले. शेतकऱ्यांना विमा अतिवृष्टीचे अनुदान त्याचबरोबर पीएम किसान व नमो शेतकरी पान २ वर...


## ग्रामसेवकांनो कामगारांची अडवणूक थांबवा!

### अनिलदादा जगताप:पंचायत समिती अधिकाऱ्यांना सूचना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



शासन परिपत्रकानुसार ग्रामिण भागाकरिता ग्रामसेवक यांना बांधकाम कामगारांचा ९० दिवसाचे काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी प्रधिकृत म्हणून नेमले आहेत. परंतू सबंधित ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक होत असून आम्हाला वरुन आदेश नाहीत, असे सांगून बांधकाम कामगारांची बोळवण केली जात आहे. बांधकाम कामगारांचे हेलपाटे बंद व्हावेत तसेच ग्रामसेवकांना बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी लागणारी सही व शिक्का देण्या बाबतचे योग्य ते मार्गदर्शन करून कामगारांचा होणारा मानसिक त्रास थांबवावा अशा सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी पंचायत समिती अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना जिल्हा शाखा, बीड ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक होत असल्यामुळे त्रस्त आहे. यामुळे या संघटनेने संगितादेवी पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे धाव घेऊन निवेदन दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लागलीच कार्यवाही करत पंचायत पान २ वर...




**सांस्कृतिक** | अनिलकुमार साळवेंना नाशिकचा दादासाहेब फाळके पुरस्कार

## एकापेक्षा एक सरस निर्मितीचा सन्मान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

कलावंत विचार मंच व कमल फिल्म प्रॉडक्शन नाशिक याच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री उद्योग नाशिक सौजन्याने दिला जाणारा मानाचा भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके राज्यस्तरीय कलावंत पुरस्कार प्रख्यात सिने-नाटय लेखक-दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांना जाहीर झाला आहे. डॉ. अनिलकुमार साळवे यांनी सिने-नाटय क्षेत्रात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल सदरील



पुरस्काराने त्यांना सन्मानीत करण्यात येत असल्याचेपुरस्कार सोहळ्याचे स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रीय लोकरत्न पुरस्कार सन्मानित सामाजिक कार्यकर्ते सुनिल मोंढे यांनी कळविले आहे.

नाटक व चित्रपट क्षेत्रातील सामाजिक व परिवर्तनवादी सांस्कृतिक कार्यासाठी आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त लेखक-दिग्दर्शक डॉ.अनिलकुमार साळवे यांना मान्यवरांच्या हस्ते सदरील पुरस्कार रविवार दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक येथील परशुराम सायखेडकर नाट्यगृहात प्रदान करण्यात येणार आहे. परिवर्तनवादी विचारधारेला समर्पित ,विद्यार्थी, शेतकरी,कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्यासिने-नाट्यकृतींचा हा सन्मान असल्याचे प्रतिपादन प्रख्यात दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांनी केले. मनोज कदम निर्मित तथा आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त व्यक्तिमत्त्व डॉ. अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित ग्लोबल आडगाव चित्रपट महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळतर्फे गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवडण्यात आला पान २ वर...

## आयुष्याची दिशाच बदलली

जादूई आडनावाच्या घराण्यात झाला असला तरी त्यांचे बालपण काहीसे वादळीच म्हणावे लागेल. दहा वर्षांपर्यंत त्यांचे आयुष्य सुरळीत गेले असले तरी पुढे आई-वडिलांचा घटस्फोट झाला आणि आयुष्याची दिशाच बदलली. आईने दुसरे लग्न केल्यानंतर आजी आणि वडिलांनी त्यांना वाढवले. लहानाचे मोठे केले. मात्र सर्वसामान्य कुटुंबात असतात तसेच त्यांच्यात आणि वडिलांमध्ये काही बाबतीत मतभेद होते. रतनजींना व्हायोलिन शिकायचे होते पण वडिलांना त्यांना पियानो शिकण्यास भाग पाडले. त्यांना अमेरिकेला जाऊन आर्किटेक्ट व्हायचे होते पण वडील इंग्लंडमध्ये मेकॅनिकल इंजिनीअरिग करण्यासाठी भाग पाडत होते. अशा एक ना अनेक मुद्द्यांवर त्यांना संघर्ष करावा लागला. इतकेच नव्हे, तर आई-वडील वेगळे झाल्यानंतर वर्गातील मुले आईवर बोलून त्यांच्या बालमनावर आघात करत होती, टोमणे मारत होती. पण या सगळ्याला अतिशय धीराने आणि विलक्षण संयमाने सामोरे कसे जायचे हे रतनजींना आजीने शिकवले आणि तोच त्यांचा आयुष्यभराचा बाणा ठरला. अपमान झाला तरी गिळून टाकायचा आणि कृत्याने, कर्तृत्वाने उत्तर द्यायचे हे ब्रिद त्यांनी अखेरपर्यंत जपले.

टाटा मोटर्स ही समूहातील कंपनी अतिशय तोट्यात आली असताना फोर्ड कंपनीला विकण्याच्या हेतूने टाटा यांनी बिल फोर्ड यांची भेट घेतली. त्यावेळी बिल फोर्ड यांनी तोट्यातील कंपनी विकत घेण्याचा करार करून आम्ही एक प्रकारे तुमच्यावर उपकार करत आहोत, अशा प्रकारची भाषा वापरली आणि एक प्रकारे त्यांचा अपमान केला. अर्थात पुढे तो करार पूर्णत्वास गेला नाही, ही गोष्ट वेगळी. पण रतन टाटा यांनी तो अपमान अतिशय शांतपणे गिळला. पुढे दहा वर्षांनंतर चित्र पालटले. आता फोर्ड यांची कंपनी डबघाईला आली तर इकडे 'टाटा मोटर्स'ने नवनवे उच्चांक गाठले. पुढे 'जॅग्वार'आणि 'लँड रोव्हर' हे फोर्ड यांचे दोन ब्रँड विकायला काढण्याची वेळ आली आणि ती खरेदी करण्यासंदर्भातील बोलणी करण्यासाठी फोर्ड यांना टाटांच्या मुंबईतील 'बॉम्बे हाऊस' या मुख्य कार्यालयात यावे लागले. रतन टाटांनी त्यांची भेट घेतली आणि अत्यंत शांतपणे हे दोन्ही ब्रँड्स विकत घेतले. व्यवहार पूर्ण झाला. त्यावेळी बिल फोर्ड म्हणाले, 'ही कंपनी विकत घेऊन तुम्ही माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत.' त्यावेळी टाटांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव वा त्यांनी उच्चारलेली वाक्ये कोणती होती, हे काही ठाऊक नाही पण त्यांनी ही बाब किती संयमाने आणि शालीनतेने घेतली असेल हे आपण नक्कीच समजू शकतो. याचा विचार करताना त्यांचा शांत आणि निगर्वी चेहरा डोळ्यांसमोर येतो. रतनजी टाटा इतकेच महान होते. व्यक्तिमत्त्वातील अशी अनेक वैशिष्ट्ये त्यांचे मोठेपण समोर मांडून जातात. थोडक्यात, रतन टाटा काय किंवा सचिन तेंडुलकर काय, अशी माणसे नेहमीच आपल्या कर्तृत्वाने बोलत असतात.

१९९१मध्ये रतन टाटा उद्योगाच्या प्रमुखपदी नियुक्त झाले. त्याआधीची त्यांची 'टाटा'मधील कारकीर्द फारशी चमकदार नव्हती. त्यांच्याकडे समूहातील 'एम्प्रेस मील'चे काम सोपवण्यात आले होते. कारभार सुधारण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली होती. त्या काळी अवघी ५० लाखांची गुंतवणूक केली असती तरी फार मोठा फायदा झाला असता. पण टाटा उद्योग समूहाने तसा निर्णय न घेतल्याची खंत रतन टाटा यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत बोलून दाखवली. समूहाने हा निर्णय न घेतल्याचा परिणाम अखेर टाटा समूहाला टेक्स्टाईल उद्योगातून बाहेर पडण्यात झाला होता. त्याही आधी रतन टाटा यांनी 'टेल्को' या कंपनीत साधी साधी कामे करत आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. तिथेही त्यांना युनियन वा इतर गोष्टींमुळे त्रास सहन करावा लागला होता. काही बाबतीत अपयश आले होते. पण न डगमगता त्यांनी काम सुरू ठेवले. जे. आर. डी. टाटा यांचे कौशल्य म्हणजे त्यांनी रतन टाटा यांच्यामधील टाटा उद्योगसमूहाचे प्रमुखपद स्वीकारण्यास योग्य ठरणाऱ्या गुणांची पारख केली. रतनजी समूहाच्या प्रमुखपदासाठी आवश्यक असणाऱ्या मापदंडांमध्ये चपखल बसत असल्याचे हेरले आणि या पदासाठी निवड केली. रतन टाटा यांनी ती सार्थ ठरवत पुढची तीस वर्षे समूहाचा नावलौकिक वाढता ठेवला. २०११-१२ मध्ये अध्यक्षपदावरून पायउतार झाले तेव्हा या उद्योगसमूहाचा विस्तार जवळपास १०० बिलियन डॉलर एवढा प्रचंड होता. विशेष म्हणजे त्यातील ६० टक्के व्यवहार आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा होता. यामुळेच ही खऱ्या अर्थाने बहुराष्ट्रीय कंपनी बनली.

# शिक्षकांवर धाक उरलेला नाही !

## बोंबला: प्रतिनियुक्तीवर असेलेल्या शिक्षकाची दारु पिवून एन्ट्री

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रतीनियुक्तीवर असलेले सहशिक्षक हे तीन दिवसा पासून बेकायदेशीररीत्या गैरहजर होते आणि ते सोमवारी शाळेत हजर झाले. त्यावेळी त्यांनी मद्यपान केले असल्याचे मुख्याध्यापिका आणि विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी ही माहिती शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांना दिली. मद्यपी शिक्षकाला वर्गात प्रवेश नाकारला. मद्याच्या अंमलाखाली तर्रर असल्याची चर्चा होताच त्या शिक्षकाने शाळेतून गाडीवरून पलायन केले आहे.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव केंद्रातील शेलगाव गांजी येथील. जिल्हा परिषदेच्या शाळेवर प्रतिनियुक्तीवर असलेले शिक्षक व्यंकट मुंडे

हे दिनांक ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास उशिरा शाळेवर आले. मात्र त्यांनी मद्यपान करून आल्याने ते नशेच्या अंमलाखाली असल्याचा संशय मुख्याध्यापिका सिंधू मुंडे आणि विद्यार्थ्यांना आला. म्हणून खबरदारी म्हणून मुख्याध्यापिका मुंडे यांनी सदर मद्याच्या अंमलाखाली असल्याचा संशय असलेल्या सहशिक्षक मुंडे यांना वर्गावर जाण्या पासून रोखले आणि या सर्व प्रकारची कल्पना त्यांनी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान बचुटे यांना फोनवरून दिली. तसेच याची माहिती गावकरी यांनाही झाली त्या नंतर काहींनी ही माहिती प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यासह युसुफवडगाव पोलीस ठाण्याला दिली. हा सर्व प्रकार महादेव मुंडे यांच्या लक्षात येताच त्यांनी गावातून पोबारा केला. दरम्यान माजलगाव तालुक्यातील घटना ताजी असतानाच केज तालुक्यात असा प्रकार झालेला आहे. शेलगाव गांजी येथे इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत प्राथमिक शाळा आहे. येथील विद्यार्थी संख्या ही २१ असून त्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून सिंधू मुंडे या कार्यरत आहेत. तर ट्रेनी शिक्षिका म्हणून कुमारी प्रीती जाधव आणि मांगवडगाव शाळेतील सहशिक्षक महादेव मुंडे यांची दिनांक १३ ऑगस्ट २०२४ पासून प्रतीनुक्ती



या प्रकरणी केंदिय मुख्याध्यापक व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मार्फत चौकशी करून वरिषांना अहवाल सादर करून कारवाई केली जाईल.
-लक्ष्मण बेडसकर
प्रभारी गट शिक्षणाधिकारी, केज

मध्यपी शिक्षकामुळे शाळा आणि गावाची नाचक्की होत आहे तसेच जर काही अनुचित प्रकार घडल्यास याला शिक्षण विभाग सर्वस्वी जबाबदार राहील त्यामुळे या शिक्षकांवर कठोर कारवाई व्हायला हवी.
-समाधान बचुटे,अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती

### शिक्षण विस्तार अधिकारी अंकुशे यांची शाळेला भेट

सदर प्रकारची माहिती मिळताच शिक्षण विस्तार अधिकारी अंकुशे यांनी शाळेला भेट दिली आणि मुख्याध्यापिका श्रीमती मुंडे यांच्याशी चर्चा उपस्थिती पटावर शेरा लिहिला आहे.

केलेली आहे.शेलगाव गांजी इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत प्राथमिक शाळा आहे. येथील विद्यार्थी संख्या ही २१ असून त्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून सिंधू मुंडे या कार्यरत आहेत. ट्रेनी शिक्षिका म्हणून कुमारी प्रीती जाधव तर मांगवडगाव शाळेतील सहशिक्षक महादेव मुंडे यांची दिनांक १३ ऑगस्ट २०२४ पासून प्रतीनुक्ती केलेली आहे.

### शुक्रवार पासून गुरुजी दांडी यात्रेवर !

शाळेचे शिक्षकांचे हजेरी पाटावर महादेव मुंडे यांनी दि. ३ ऑक्टोबर रोजी ते शाळेला हजर होते त्या नंतर त्यांनी दि. ४ ऑक्टोबर रोजी मुख्याध्यापिका सिंधू मुंडे यांना फोन करून त्यांची किरकोळ रजा मंजूर करण्याचे कळविले. त्या वरून मुख्याध्यापिका मुंडे यांनी तशी नोंद केली आहे. मात्र किरकोळ रजा घेण्या पूर्वी लेखी अर्ज सादर करून रजा मंजूर झाल्यास नंतर स्थलांतरास परवानगी दिली जाते. मात्र मुख्याध्यापिका मुंडे यांनी केवळ फोनवर किरकोळ रजा कशी काय मंजुर केली ?

### या पूर्वीही मद्य पिवून केली होती वरिष्ठांना शिवीगाळ

या पूर्वी दि. १४ मार्च रोजी केज येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे दुपारी २:३० वा. मध्यंतरच्या वेळेत घराकडे जात असताना केज पंचायत समिती कार्यालया समोर त्यांना तीन शिक्षकानी रस्त्यात अडवून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली होती. या प्रकरणी गट शिक्षणाधिकारी बेडसकर यांच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात महादेव मुंडे आणि इतरांवर गुन्हा दाखल झाला होता. तसेच लाखा येथील ग्रामस्थ आणि पालकांच्या तक्रारी वरून मुंडे यांना शाळेवर येण्यास विरोध केल्याने त्यांना वरिष्ठ कार्यालयात हलविले होते.

## क्रीडा विभागाच्या वतीने आवरगाव येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा



धारुर/पुण्यभूमी प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे यांच्या वतीने शासकीय शालेय तालुका स्तरावरील कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन धारूर तालुक्यातील आदर्श आवरगाव या ठिकाणी करण्यात आले होते या कबड्डी स्पर्धेत १४.१७.१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे एकून ४३ संघ सहभागी झाले होते.क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांच्या अंतर्गत शासकीय शालेय तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा २०२४ २५ चे आयोजन दिनांक १२ सप्टेंबर रोजी धारूर तालुक्यातील आवरगाव या ठिकाणी कबड्डी स्पर्धा आयोजित केल्या होत्या स्पर्धेत. या कबड्डी स्पर्धे च्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून धारूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे कार्यक्रमाचे अध्यक्ष आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप ,ज्येष्ठ पत्रकार अनिलजी महाजन, यांच्यासह पंचक्रोशीतून सर्व सरपंच नागरिक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लहूकुमार गव्हाणे सर तालुका क्रीडा संयोजक यांनी केले तर सूत्रसंचलन मुंजाराम निरडे सर यांनी केले तर पंच म्हणून काळे सर,शिनगारे राम सर,चव्हाण सर ,वैरागे ,मनोज गव्हाणे, साळुंखे ,मुंडे , समुद्रे ,गायकवाड,राऊत सर,यांनी विशेष परिश्रम घेतले.१४ वर्ष मुलांच्या गटात प्रथम जिजामाता विद्यालय तेलगाव,१४ वर्ष मुलींच्या गटात नाथकृपा माध्यमिक विद्यालय कासारी बोडखा, १७ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम न्यू हायस्कूल कारी, १७ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम वसुंधरा माध्यमिक विद्यालय कोळपिंपरी, १९ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर,व १९ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर या गटांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे त्याबद्दल त्यांचे मातृभूमी सार्वजनिक गणेश मंडळ व आदर्श ग्रामपंचायत आवरगाव यांच्या वतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले

## पान एक वरून

**बीडचे एसपी जातीय द्वेषातून**

होती. परंतु मोर्चाच्या एक दिवसांपूर्वी बीड पोलीस प्रशासनाने परवानगी न देता तीन-चार वेळा स्वतःचा निर्णय बदलून बीड येथील आंबेडकरी जनतेला फसविण्याचे व मूर्ख बनविण्याचे काम केले.अर्ध्या अर्ध्या तासाच्या अंतरात परवानगी देऊ व परवानगी नाकारण्यात येत आहे असे बीडचे सहाय्यक पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व पोलीस उपाधीक्षक गोल्डे यांनी वक्तव्य केले व शेवटच्या दिवशी पर्यंत बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेला अंधारात ठेवण्याचे काम केले. शेवटच्या क्षणी परवानगी नाकारल्याचे सांगितले. जिल्हाभरातून आंदोलनासाठी बीड शहरात दाखल होण्यासाठी आलेल्या आंबेडकरी जनसमुदायाला रस्त्यामध्ये आडवून त्यांना मार हान केली.त्यानंतर दि.१० ऑक्टोबर रोजी पुन्हा एकदा बीड शहरातील भीमसैनिकांनी दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजी मोर्चा काढण्यासाठी परवानगीचे पत्र दिले त्यानंतर दि.११ ऑक्टोबर रोजी बीडचे जातीवादी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी आंदोलनासाठी परवानगी मिळणार नाही असे स्पष्टपणे सांगितले.
बीड शहरामध्ये व जिल्हाभरात दसऱ्याच्या निमित्ताने अनेक राजकीय पक्षांना व सामाजिक संघटनांना बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मोठमोठे कार्यक्रम घेण्यासाठी परवानग्या दिल्या. परंतु केवळ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने आंदोलन पुकारल्यामुळे जाणीवपूर्वक या आंदोलनाला हाणून पाडण्यासाठी एसपी अविनाश बारगळ यांनी बीडच्या आंबेडकरी जनतेला वेठीस धरले आहे म्हणून पोलीस आयुक्त यांना निवेदन करण्यात येते की,बीड शहरामध्ये दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजी होणाऱ्या आंदोलनाला तात्काळ परवानगी देण्याचे बीड पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना आदेश करावेत अन्यथा जातीवादी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांना निलंबित करावे अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी.अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

**राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मगांवी शक्तीचा**

घेण्याचे आवाहन करतांना म्हटले आहे, की सावरगावचा दसरा मेळावा ही आपली परंपरा पुढे कायम ठेवण्यासाठी तुम्ही आणि मी देखील उत्सूक आहे. तुम्ही मोठ्या संख्येने येणार आहात याची मला कल्पना आहे. मी तुम्हाला काही सूचना सांगणार आहे. तुम्ही त्या पाळाल याची मला खात्री आहे.मेळाव्याला येतांना घरून आपली भाकरी, चटणीची शिदोरी सोबत घेऊन या. सोबत पाण्याची बाटली, त्यासोबतच साखर, मीठ मिसळून तयार केलेल्या पाण्याची दुसरी बाटली आणि साखर देखील आपल्या सोबत ठेवा. ऊन प्रचंड असणार आहे, त्याच्यापासून बचाव करण्यासाठी गमचा, टोपी, स्कार्फ आणायला विसरू नका.वाहने वेगाने चालवू नका, शातंतेने या. सकाळी १० वाजे दरम्यान प्रांगणात बसता येईल यादृष्टीने तयारी ठेवा. वाहनांनी येतांना आपली वाहने योग्यरितीने पार्क करा जेणेकरून येणाऱ्या इतर वाहनांची व नागरिकांची गैरसोय होणार नाही. दसरा मेळावा आपल्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करायचा आहेच, पण त्यासोबतच काळजी देखील घ्यायची आहे, असे आवाहन देखील पंकजाताई मुंडे यांनी केले.

**म्हणून विकासाला चालना**

सन्मान योजनेचा निधी मतदारसंघातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असतात. कारण मी भरभरून दोन्ही हातांनी देणाऱ्या सरकारचा प्रतिनिधी आहे. त्यामुळे आता जनतेने सुद्धा ठरवावे की देणाऱ्यांच्या पाठीशी राहायचे आहे की तुमच्याच खिशातील आहे तेही काढून घेणाऱ्यांच्या पाठीशी राहायचे आहे, असेही यावेळी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. या कार्यक्रमास शिवाजी शिरसाट, पिंटू मुंडे, माऊलीतात्या गडदे, विश्वंभर फड, माऊली मुंडे, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब चव्हाण, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, परळीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, अंबाजोगाईच्या गटविकास अधिकारी श्रीमती दिवाने, नायब तहसिलदार बाबुराव रुपनर, अतिरिक्त गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

**ग्रामसेवकांनो कामगारांची अडवणूक**

समिती अधिकारी सर्व यांना पत्रक काढून ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक थांबवावी व ग्रामसेवकांकडून काम होत नसल्यास त्या ठिकाणी अन्य कुणाची नियुक्ती करावे अशा सूचना केल्या आहेत. मात्र अद्याप पंचायत समितीतील अधिकाऱ्यांनी कुठलीच कार्यवाही केली नसल्याने बांधकाम कामगारांनी अनिलदादा जगताप यांच्यासमोर आपल्या अडचणींचा टाहो टाहो फोडला. या सर्व अडचणी लक्षात अनिलदादा जगताप यांनी पत्रक जाहीर करून पंचायत समिती अधिकारी सर्व यांना सूचना केल्या आहेत की, बीड जिल्हयातील ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक तात्काळ थांबवा. अन्यथा शिवसेना पंचायत समितीमध्ये बांधकाम कामगारांच्या अडचणी सोडविण्याकरिता येईल व तिथून पुढे होणाऱ्या परिणामांना आम्ही जिम्मेदार नसतोल.

**एकापेक्षा एक सरस**

होता.तसेच डॉ. अनिलकुमार साळवे यांना न्यू जर्सी अमेरिका यांचा बेस्ट रायटर अवॉर्ड,महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका यांचा रा.शं.दातार नाट्यलेखन पुरस्कार,नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार आदी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. सदरील सन्मान प्राप्त झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रख्यात दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांचे अभिनंदन केले आहे.

## पान सहा वरून

**मोफत आरोग्य शिबिरातून**

करून औषधोपचार केला जातो. या समाज उपयोगी शिबिरा मुळे ग्रामस्थांस मोठा दिलासा मिळत असल्याचे दिसून येत आहे.काकू नाना प्रतिष्ठानचे डॉ.अरुण भस्मे,प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उप प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ. अंजली पवार,समन्वयक डॉ.अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान,डॉ.श्रेयस ढाकणे,डॉ.विश्वजीत बोंडार,डॉ. आनंद दाभाडे,डॉ.योगेश धुमक यांच्या परिश्रमाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर यशस्वी झाले.

**दोन्ही गडावर जाणाऱ्या भाविकांसाठी**

नियोजन करण्यात आले. बीड शहरानजिक असलेल्या नवगण शिक्षण संस्था संचलित सैनिकी विद्यालयासमोरील मुख्य रोडलगत भाविकांसाठी स्टॉल उभारून आज दिवसभर अल्पोपहार, पाण्याची उत्तम सोय केली जाणार आहे. या मार्गावरून भगवान भक्तीगड, नारायणगडावर जाणाऱ्या भाविकांनी अल्पोपहाराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले आहे.

**दीक्षाभूमीकडे येणाऱ्या अनुयायांकडून**

अकोला आणि महाराष्ट्रातील इतर ठिकाणी लाखो बौद्ध अनुयायी धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यासाठी प्रवास करत असतात. महाराष्ट्र आणि देशभरातील ग्रामीण भागातून लोक येथे तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी प्रवास करत असतात. आम्ही वंचित बहुजन आघाडीकडून मागणी करतो की, आपण धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त प्रवास करणाऱ्या बौध्द अनुयायांकडून आकारण्यात येणारा टोल माफ करावा, असे या पत्रात म्हटले आहे

**कार्यकर्ता संवाद बैठकीस**

कार्यकर्ते संवाद बैठकीस मोठ्या संख्येने येणार आहेत तरी गेवराई तालुक्यातील जास्तीत जास्त बहुजन समाज बांधवांने मोठ्या संख्येनेकार्यकर्ता संवाद बैठकीसाठी उपस्थित रहावे असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका महासचिव किशोर भोले यांनी केले आहे.

**परळीमध्ये संधी दिल्यास**

दशकांपासून परळीच्या व्यापार उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले अभिजीत देशमुख यांनी परळी परिसरातील सायखेडा (ता.सोनपेठ) येथे महाराष्ट्र शेतकरी शुगर या साखर कारखान्याची उभारणी केली. हा कारखाना अखंडपणे सुरू रहावा, शेतकऱ्यांचे हित साधले जावे .म्हणून हा कारखाना हस्तांतरित केला.आगामी परळी विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी आपण इच्छूक आहोत, इतर इच्छुक उमेदवारांबरोबरच आपलीही पक्षाने दखल घेवून मुलाखतीसाठी आपल्याला मुंबईत पक्ष कार्यालयात बोलावून घेतले होते. या निवडणुकीसाठी आपण इच्छूक असून पक्षाने संधी दिल्यास आपण ही निवडणूक लढवण्यास तयार आहोत असे अभिजीत देशमुख यांनी यावेळी सांगितले. दरम्यान परळी विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार ,आमदार रोहितदादा पवार, बजरंग बप्पा सोनवणे ,मेहबूब शेख युवक अध्यक्ष राष्ट्रवादि प्रदेश कॉंग्रेस शरदचंद्र पवार. यांच्यासोबत आपली चर्चाही झाली असल्याचे अभिजीत देशमुख यांनी सांगितले. परळीतील व परळी मतदार संघातील सामाजिक, राजकीय विषयावर शरदचंद्र पवार साहेब व रोहितदादा पवार यांनी आपल्याबरोबर चर्चा केल्याचे देशमुख म्हणाले. येणाऱ्या काळात मला जे काही शक्य होईल तेवढे काम मी परळी वैजनाथ मतदार संघातील माझ्या मायबाप जनते साठी करेल. असे देशमुख म्हणाले.

**निधी खेचून आणण्याचा**

त्यापाठोपाठ जिल्ह्याचे उद्योग भवन, विविध रस्त्यांची दर्जा उन्नती, यासह पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी विविध विकास कामांना निधी खेचून आणण्याचा सध्या धडाका सुरू आहे.

**आज संपर्क कार्यालयाचे**

राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.फौजिया खान यांच्या हस्ते शुभारंभ होत आहे. यानिमित्ताने आयोजित भव्य कार्यक्रम प्रसंगी मतदारसंघातील अनेक मान्यवरांचा पक्षात प्रवेश होणार असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष वर्षा रायभोळे व शहराध्यक्ष ॲड. कल्पना सतीश देशमुख यांनी केले आहे.

**पद्मविभूषण रतन टाटांना**

सर्वोत्कृष्ट व्यवसाय करू शकतात याचे मूर्तीमंत उदाहरण रतन टाटा आहेत. त्यांनी झोराष्ट्रीयन शास्त्रात नमूद केल्यानुसार यश मिळण्यासाठी नीतीमूल्ये सोडायची गरज नाही या तत्वाचे पालन केले होते.राहुल कराड म्हणाले, टाटांच्या पिढीने देशासाठी बलिदान दिले आहे. शिक्षण क्षेत्रातील क्रांती मध्ये त्यांचा आमुलाग्र वाटा असून एमआयटीला अभिमान आहे की आमच्या विद्यार्थ्याने नॅनो कार बनविण्यात महत्वाची भूमिका पार पाडली. रतन टाटा यांच्यावर महात्मा गांधीजी यांचा प्रभाव होता. त्यांनी विश्वस्ताची भूमिका स्विकारून सामाजिक समतोल साधण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. अशी भावना ज्येष्ठ पत्रकार अरूण खोरे यांनी व्यक्त केले.तसेच ते एक उद्योगपती बरोबरच उत्कृष्ट वचनबद्ध राष्ट्रप्रेमी, परोपकारी, व्यावहारीक आणि अत्यंत नम्र आत्मा जे जगभरातील लाखों लोकांसाठी एक प्रेरणा आणि रोल मॉडेल होते. अशी भावना डॉ. आर.एम.चिटणीस, डॉ. संजय उपाध्ये, डॉ. एस.एन.पठाण, प्रा. रतनलाल सोनग्रा, डॉ. दत्ता दंडगे आणि नलावडे महाराज यांनी व्यक्त केल्या.माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहतील विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक व कर्मचारी यांनी यावेळी रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहिली.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# झेडपी कन्या शाळेचे यश प्रेरणादायी

## अॅड. रविंद्र कानडे — रोटरी क्लबकडून स्पोर्टचे वितरण

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेच्या हॉलीबॉल संघाने विभाग स्तरावर प्रथम येत राज्यस्तरासाठी पात्र होत मिळवलेले यश हे सर्वांसाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोटेरियन रवींद्र कानडे यांनी जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेच्या हॉलीबॉल संघाला रोटरी क्लबच्या वतीने स्पोर्ट शूजच्या वितरण प्रसंगी केले.पुढे बोलताना ते म्हणाले की,जिद्द,चिकाटी,परिश्रम व सततच्या सरावाने यश संपादन करता येते हे ग्रामीण भागातील व जिल्हा परिषद मध्ये शिकत असणाऱ्या मुलींनी सर्वांना दाखवून दिले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे प्रोजेक्ट चेअरमन रोटेरियन सौ वर्षा



सोळंके,सचिव लता जोशी, सौ सुरेखा गवळी मॅडम,गोविंदभाऊ बजाज,डॉ.शंकर जुजगर, लक्ष्मीनारायण मुंदडा,दामोदर संदीकर,जगदीश साखरे,राजेश देशपांडे डिस्ट्रिक सहाय्यक प्रांतपाल श्री विवेक गंगणे ,श्री निरंजन वाघमारे,,डॉ.स्वानंद कुलकर्णी,,श्री संदीप गुंडेवार,,यांचे मोलाचे सहकार्य लाभले. भारताची ज्ञानाई क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर दहावीतील मुलींनी स्वागत गीत गायले.अतिथींच्या सत्कारानंतर शाळेचे सहशिक्षक बाळासाहेब सोनसळे यांनी प्रास्ताविक केले.त्यामध्ये त्यांनी सांगितले की,विभाग स्तरावर एकूण १४ संघ होते. त्यापैकी जिल्हा परिषद शाळेचा एकमेव संघ होता.या संघाने कोणतेही भौतिक साधने नसताना एकतर्फी विजय मिळवला.मुलींनी हे यश खेचून आणल्याबद्दल सर्व रोटरी सदस्यांनी मुलींचे कौतुक करून त्यांना दर्जेदार अशा स्पोर्ट शूजचे वितरण केले.या विजयी संघात कर्णधार अक्षरा पवार,शितल राठोड,सोमेश्वरी टाक,अस्मिता कुंभार,माधुरी गुणवंत,फारिया बेग,रुची दळवी,अनन्या चव्हाण,दिपाली शेळके,माधुरी तौर,अपेक्षा घेणे,रिया शिंदे हे खेळाडू आहेत. रोटरी क्लबच्या प्रोजेक्ट चेअरमन वर्षा सोळंके यांनी मुलींना शुभेच्छा देताना त्यांचा गौरव करून शाळेमध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त नवदुर्गांचा गौरव केल्याची भावना व्यक्त केली.विशेष बाब म्हणजे गोविंदभाऊ बजाज यांनी सॉक्स साठी नगदी रक्कम शाळेला दिली.तसेच भविष्यात देखील शाळेला मदतीची गरज लागली तर रोटरी सदैव आपल्या पाठीशी राहील अशी ग्वाही दिली.

हॉलीबॉल संघाचे प्रशिक्षक राजकुमार सोनपसारे व शेख अब्दुल यांचा सत्कार सर्व मान्यवरांच्या हस्ते झाला.या बहारदार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख शरद नायबळ यांनी केले.शेवटी सर्वांचे आभार नारायण भाळशंकर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनकर वाघमारे,मधुकर मकसरे,चंद्रकांत यादव,विलास रेवलकर,बालासाहेब कांबळे,सुंदर काळे,मंदा सारूक,संगीता राठोड,संगीता शिंदे,ज्योती कोगीडरकर,जयश्री लोणीकर,हिरा मगर,हसीब सौदागर,बालासाहेब जामकर,गोरख उघडे यांनी परिश्रम घेतले

# नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी

## निवेदन: शिक्षक पेशाला काळिमा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे सत्र थांबता थांबत नसल्याचे चित्र तर आहेच परंतु यामध्ये चिमुकल्या मुलींसुद्धा वेगळ्या दिसून येत नाहीत.बदलापूर येथील चिमुकलीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेने राज्यसह देश हादरला असताना परभणीच्या सोनपेठ शहरातून अशीच एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. ऐका राजकीय वरद हस्त असलेल्याइंग्रजी शाळेत शिकणाऱ्या पाच वर्षीय चिमुकलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना ५ ऑक्टोबर रोजी घडली.या घटनेविषयी बीड जिल्हा कहार समाजाच्या वतीने मा. जिल्हाधिकारी बीड व मा. पोलीस अधीक्षक यांना निवेदन देऊन आरोपीस तात्काळ अटक करून या नराधमांस फाशीची शिक्षा देण्यात यावी असे निवेदनात नमूद करून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

सोनपेठ पोलीस आरोपीस अटक करण्यास टाळाटाळ करत असून सदरील आरोपीस अटक झाली नाही तर सोमवारी परभणी येथे मोठे आंदोलन कहार भोई समाज करणार आहे.असा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.सदर घटनेतील नराधमास तत्काळ अटक करण्यात यावी, हे प्रकरण जलदगतीन्यायालयात चालवून आरोपीस फाशीची शिक्षा देण्यात यावी,अशा मागण्या निवेदनाद्वारे सरकारकडे करण्यात आल्या.

आरोपीवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी कहार समाजाच्या वतीने देण्यात आला. यावेळी श्री. किशन ता तांगडे, सुंदर चव्हाण, फुलचंद लुचारे, भीमा गहिरे,मनोज लुचारे, बाळू लुचारे, अशोक लुचारे, मनोज पाबळे,दत्ता गुणवंत, सतीश लुचारे,परमेश्वर पंचलोटे व इतर कहार समाज बांधव, नागरिकमोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळेच्या मैदानात झाडावर कोसळली वीज

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

गोंदेगाव जवळील म्हशीकोठा येथील प्राथमिक शाळेच्या मैदानात असलेल्या लिंबाच्या झाडावर वीज कोसळल्या ची घटना शुक्रवारी दुपारी एक वाजता घडली दरम्यान शाळेची मधली सुट्टी झालेली असल्याने पुढील अनंर्थ टळला आहे



गोंदेगाव जवळ असलेल्या म्हशींकोठा गावाच्या शाळेच्या आवारात दुपारी एक वाजता विजांचा कडकडाटात सुरू असताना अचानक वीज मैदानात असलेल्या लिंबाचा झाडावर कोसळून भला मोठा आवाज झाला दरम्यान वीज कोसळल्या वर झाडाची खोड जळून खाक झाले आहे दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ ढाकरे व इतर शिक्षक या विजेच्या आवाजाने गोंधळून गेले दरम्यान पहिली ते चौथी वर्ग असलेल्या या शाळेत १८ विद्यार्थी मधल्या सुट्टीत घरी गेलेली होती वीज कोसळलं तेव्हा मैदानावर कोणीही नव्हते त्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे.

# बाबासाहेबांसाठी जीवाची परवा नाही!

## आंदोलन: उपोषणार्थी मेजर अनुरथ वीरांची प्रकृती खालावली

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव बीड येथील रेल्वे स्थानकाला कायमस्वरूपी घोषित करावे.या मागणीसाठी मेजर अनुरथ वीर दिनांक १०ऑक्टोबर २०२४. पासून सकाळी १० वाजले पासून येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे.अद्याप त्यांच्या उपोषणाचा दखल प्रशासकीय पातळीवर घेतली गेली नाही. उपोषणार्थी मेजर अनुरथ वीर,यांची प्रकृती झपाट्याने खालावत असल्याचे जाणवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे नामांतर कृती समिती व सबंध आंबेडकर समूहातून शासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.यावेळी उपोषणाच्या समर्थनार्थ आंबेडकरी समूहातील विविध राजकीय पक्ष,सामाजिक



संघटना ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव खंडू जाधव,जिल्हा संघटक डॉ. गणेश खेमाडे,सहसंघटक अर्जुन जौजाळ,एड. तेजस वडमारे, एडवोकेट केतन गायकवाड, सूर्यकांत ठोकळ,सुहास विद्यागर, यशपाल भैय्या डावकर,कीर्ती शिंदे बीड आझाद समाज पार्टी महीला शहर अध्यक्ष,पोर्णिमा वीर,शेखर धनवे, शिल्पा धनवे,रमा धनवे,मनीषा वीर,पूजा अहिरे, सुमन पवार,केशर वडमारे,लता गायकवाड,लंका वाघमारे,रमाबाई धनवे, गणेश वीर उमेश तुळवे, यांचेसह असंख्य आंबेडकर चळवळतील कार्यकर्ते यांनी उपोषणास पाठिंबा दर्शवला.

# महिला महाविद्यालयाचे स्पर्धेत यश

## क्रीडा: विद्यार्थिनीची बुध्दीबळ स्पर्धेत निवड

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनी स्नेहा हमिने ही बीड जिल्हा झोन आंतर महाविद्यालयीन बुध्दीबळ निवड चाचणीत पहिला क्रमांक पटकावला असून तीची विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय संघात निवड झाली आहे.



डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व नवगण महाविद्यालय परळी यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हा झोन आंतर महाविद्यालयीन बुध्दीबळ स्पर्धा व निवड चाचणीचे आयोजन गुरुवारी (ता.१०) करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय निवड चाचणीत लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्नेहा हमिने हीने पहिला क्रमांक पटकावला असून तिची विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय संघात निवड झाली आहे. या विद्यार्थिनीला महाविद्यालयातील क्रिडा संचालक प्रा डॉ प्रविण दिग्रसकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, सचिव रवींद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दोघांचेही अभिनंदन केले आहे.

# राहुरीत काँग्रेसला संजीवनी

## पक्षांतर: चाचा तनपुरे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

राहुरी पुण्यभूमी प्रतिनिधी विकास मंडळाचे सर्वेसर्वा रावसाहेब चाचा तनपुरे यांनी आपल्या शेकडो समर्थकांना सोबत घेऊन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत संगमनेर येथे जाहीर प्रवेश केला त्यांच्या काँग्रेस प्रवेशाने राहुरीत काँग्रेसला संजीवनी मिळाली आहे



राहुरी तालुक्यात विकास मंडळाचे मोठ्या प्रमाणात संघटन असुन मागील काही काळ भाजप नेत्यांचा मार्गदर्शना खाली सर्व पदाधिकारी कार्यरत होते काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये रावसाहेब चाचा तनपुरे यांच्यासह गोपाळ शेठ अग्रवाल दिलीपशेठ पारख सत्यवान पवार रामभाऊ बोरुडे अशोक तनपुरे डॉ धनंजय मेहेत्रे ज्ञानेश्वर पोपळघट सोन्याबापू जगधने सुभाष वराळे सुनील पवार नवनीत दरक प्रतीक तनपुरे कारभारी खुळे राजू मकासरे वसीम देशमुख आदींसह प्रमुख कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला या वेळी काँग्रेसचे राहुरी तालुका अध्यक्ष बाळासाहेब आढाव यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होतेरावसाहेब चाचा तनपुरे यांच्या काँग्रेस प्रवेशाने राहुरी तालुक्यात पुन्हा एकदा काँग्रेससाठी अनुकूल वातावरण तयार होणार आहे आगामी विधानसभा निवडणुकीत व पुढे होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेसला नव संजीवनी मिळणार हे मात्र निश्चित

# महापुरुषांच्या नावाचा एकेरी उल्लेख

## अॅड. विशाल घोबाळे:विद्यमान आमदारवर कारवाई करा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

विध्यमान आमदार नमिता मुंदडा यांनी भाषण करताना, छत्रपती शिवाजी महाराज, व परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा, शिवाजी आणि आंबेडकर असा एकेरी उल्लेख केल्याने महापुरुषांचा अवमान झाला आहे, त्या वक्तव्या मुळे छत्रपती शिवराय यांचे मावळ्यांचे व भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांच्या भावना दुखावल्या आहेत.



त्यामुळे नमिता यांनी तात्काळ माफी मागाववी.यापूर्वीच याच आमदार यांच्या सासऱ्याचे व सासूचे फोटो महापुरुषांच्या फोटो सोबत ग्रामपंचायत मध्ये लावलेले आढळून आल्याने अंबाजोगाई तालुका व केज तालुक्यातील लोकांनी, सर्वपक्षीय निदर्शने करून आमदार व पत्ती, व सासरे, सरपंच, सदस्य, ग्रामसेवक यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आलेली आहे, सदर तक्रार अर्जावर तपास सुरु असून, सदर ग्रामपंचायत मधील महापुरुषांच्या सोबत लावलेलं आमदार चे सासू, सासरे यांचे फोटो काढण्यात आलेना आले, तेवढ्यात केज तालुका येथील चिंचोली माळी येथील आरक्षण योद्धा मनोज दादा जरांगे यांचे आंदोलक समर्थक आरक्षण योद्धा तथा पत्रकार रोहन गलांडे यांना आमदार यांचे सासरे व समर्थक यांनी धमक्या दिल्याचे तक्रार ही देण्यात आली असून तो ही तपास सुरु आहे, त्याचा बबरोबर केज मतदार संघात नेकनूर येथे ही सदर आमदार नमिता यांच्या विरुद्ध जनता इतर कारणास्तव ही रस्त्यावर उतरलेली होती, आंदोलन करण्यात आले होते. मतदारसंघात गेल्या ६० वर्षात कसलाही वी कास झाला नाही अशी जनतेत चर्चा आहे.

# नवरात्रोत्सवात नागरिकांची अलोट गर्दी!

## अध्यात्मिक : संयोजन समितीचे उल्लेखनिय नियोजन

बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी

सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या पुढाकारातून 'नमो रमो नवरात्री' या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे यंदाही 'नमो रमो नवरात्री'चे आयोजन ३ ते १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत सावळाराम महाराज क्रीडा संकुल, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व येथे करण्यात आले आहे. त्याला नागरिकांची अलोट गर्दी होत आहे.



या नवरात्र महोत्सवात तारक मेहता फेम दिलीप जोशी, अभिनेते जितेंद्र जोशी, गश्मीर महाजनी, मनजोत सिंग, यश सोनी, मल्हार ठाकर, करण टॅकर, आशिष गुलाटी आणि अभिनेत्री सई मांजरेकर, उर्मिला कानेटकर, श्रद्धा डांगर, रिधिमा पंडित व आर्या जाधव आदी मराठी-हिंदी-गुजराथी सिनेसृष्टीतील अभिनेते आणि अभिनेत्री यांचा मोठ्या प्रमाणात उत्साहाने सहभागी झाले आहेत. गरबा प्रेमींना सुरक्षित, निरोगी आणि आनंदी वातावरणात गरब्याचा मनमुराद आनंद लुटता यावा, यासाठी प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीवर बारकाईने लक्ष देण्यात आले आहे. संपूर्ण डोंबिवली परिसरात नमो रमो गरबामुळे एक अनोखी ऊर्जा वातावरणात निर्माण झाली आहे. , अशी माहिती आमदार व मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली.

## विजय डोंगरे — तलवाडा येथे विद्यार्थी महामेळावा उत्साहात

# भौतिक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा जि.प.मा. शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार डोंगरे सर यांच्या संकल्पनेतून शुक्रवार दि.११ ऑक्टोबर २०२४ रोजी शाळेच्या प्रांगणात माजी विद्यार्थी महामेळावा मोठया उत्साहात संपन्न झाला. या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी भौतिक सुविधा उपलब्ध करणे काळाची गरज असून त्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी भरीव स्वरूपात आर्थिक मदत करावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त शिक्षक आर.बी. कुलकर्णी, आर.जी.राऊत सर तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन पखाले, उपाध्यक्ष मदन काळे यांच्यासह माजी विद्यार्थी उपस्थित होते.

तलवाडयातच नव्हे तर बीड जिल्ह्यात प्रथमतःच माजी विद्यार्थ्यांचा अशाप्रकारे महामेळावा घेण्याची हि पहिलीच वेळ असून या कार्यक्रमास या शाळेतील माजी विद्यार्थी असलेले निवृत्त लेखाधिकारी श्री मते, माजी कार्यकारी अभियंता कल्याण हात्ते, डॉ.बाबासाहेब




हात्ते, पोलिस उपनिरीक्षक शेख राजेक, प्रकाश लोखंडे सर, सचिन जोशी, उद्योजक तुकाराम लाड, माजी जि.प.सदस्य अरूण जाधव, तहसीलदार रत्नाकर कुलकर्णी यांच्यासह माजी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी तुकाराम लाड यांनी २६००० रूपये, अरूण जाधव यांनी २५००० रूपये, उपसरपंच आक्रम सौदागर यांनी ११००० कल्याण हात्ते यांनी २१००० रूपये, डॉ. बाबासाहेब हात्ते यांनी ११००० रूपये, शेख राजेक यांनी ११००० रूपये अशाप्रकारे इतर बहुतांश माजी विद्यार्थी यांनी आपापल्या परीने आर्थिक मदत देण्याचे काम केले आहे. या कार्यक्रमात सतीष गांधले यांनी शाळेत लावण्यासाठी दहा लाईटच्या ट्यूब मदत म्हणून दिल्या आहेत. यावेळी आर.आर. आबा बहीण, माऊली डोंगरे, श्री मते, कल्याण हात्ते, अरूण जाधव आदींनी मोलाचे मार्गदर्शन केले. गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी तसेच गावकरी यांनी जि.प.मा.शा.तलवाडा या शाळेमध्ये विविध भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी फर्निचर, वॉटर फिल्टर, शौचालय दुरूस्ती, इतर डिजिटल सुविधा कार्यान्वित करणे तसेच शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उउद्धत कॅमेरे बसवणे यासाठी आर्थिक मदत करावी असे मुख्याध्यापक डोंगरे सर यांनी सांगितले. वरील कामे मार्गी लावण्यासाठी दहा लाखांपेक्षा अधिक निधीची आवश्यकता आहे असेही ते म्हणाले. यासाठी शालेय व्यवस्थापन समिती व सर्व शिक्षकवृंद यांनी पुढाकार घेऊन आपल्या गावातून लोकवर्गणी जमा करून ही सर्व कामे मार्गी लावावयची आहेत. आपापल्या परीने शाळेच्या भौतिक व शैक्षणिक सुविधांसाठी आर्थिक मदत म्हणून आतापर्यंत तलवाडा गावातून दोन लाख रूपयांच्या आसपास मदत लोकवर्गणीतून जमा झाली असल्याची माहिती देखील मुख्याध्यापक विजयकुमार डोंगरे यांनी दिली. आता माजी विद्यार्थी महामेळाव्याच्या माध्यमातून जास्तीत-जास्त मदत कशी करता येईल यासाठी हा महामेळावा घेण्यात आला असून सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेची सुधारणा व्हावी म्हणून आपापल्या परीने जी काही आर्थिक मदत देता येईल ती द्यावी अशी विनंती देखील मुख्याध्यापक विजयकुमार डोंगरे यांनी यावेळी केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू खेत्रे सर यांनी तर आभारप्रदर्शन खेडकर सर यांनी केले.

# सलग तिसऱ्या दिवशी जोरदार पाऊस!

## अस्मानी: कापसासह मका पिकांचे नुकसान

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशीही परतीच्या पावसाने धुमाकूळ सुरू केला आहे शुक्रवारी दुपारी तीन वाजता सोयगाव सह जरंडी,परिसरात झाल्या नंतर सायंकाळी बनोटीसह परीसरात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे शुक्रवारी सकाळपासून टप्प्याटप्प्याने तालुक्यात दीवसभर पाऊस पडला सायंकाळी पाच वाजता बनोटी, गोंदेगाव परीसरात मुसळधार पाऊस झाल्याने वेचणी साठी असलेला कापूस व सोगणी करुन ठेवलेला मका पुर्णपणे पाण्यात भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन शेतकरी अडचणीत आला आहे......

वरठान बनोटी, गोदेंगाव,किन्ही हनुमंत खेडा या भागात मुसळधार पाऊस झाल्याने सर्कल मध्ये शेतकऱ्यांचे पांढरे सोने म्हणून ओळख असलेल्या कापसाची भिजून वाता झाल्या आहे त्यामुळे शनिवारी विजया दशमी सणावर विरजण पसरले आहे कापूस पिकावर शेतकऱ्यांची देवाण घेवाण



होत असते परीसरात शेतकरी चे मुख्य पिक कापुस आहे सद्या परीसरात कापुस पिकाची पहीली वेचणी सुरु असुन तीन दीवसापासून परतीचा पाऊस सुरू झाल्याने फुटलेला कापुस पुर्णपणे ओला झालेला आहे काही शेतकऱ्यांनी थोड्याफार प्रमाणात कापूस वेचला परंतु त्या कापसाला देखील कवडीमोल भाव मिळत आहे परतीच्या पावसाने कैरी सडली असून फुटलेला कापूस भिजून त्यावर कोंब उगवले आहे काही प्रमाणात कापसाचे बोंडे फुटले आहे ते देखील परतीच्या पावसाने ओलेचिंब होऊन त्यांच्या वाती झालेल्या आहे



## नौपाडा कोपरी येथे स्वच्छता मोहिमेस प्रतिसाद

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार विविध प्रभागसमिती कार्यक्षेत्रात सर्वंकष स्वच्छता मोहीम सुरू आहे. आज नौपाडा कोपरी प्रभाग समिती कार्यक्षेत्रात सदरची मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेस नागरिकांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत ठाणे पश्चिम चेंदणी कोळीवाडा येथील भुयारी मार्ग, ठाणे महाविद्यालय परिसर, खारटन रोड, दादोजी कोंडदेव स्टेडियम परिसर, महागिरी, विसर्जन घाट, ठाणे शहर पोलीस आयुक्त कार्यालय परिसर, कळवा नाका परिसरात सफाई करण्यात आली. त्याचप्रमाणे जवाहर बाग स्मशानभूमी, ए वन फर्निचर शॉप परिसर, तहसील कार्यालय, अशोक सिनेमा परिसर, ठाणे रेल्वे स्थानकातील १५० मीटर परिसर, अलोक हॉटेल, ठाणे हेल्थ केअर रुग्णालय, मल्हार सिनेमा परिसर, तीन हात नाका, राम मारुती रोड, मासुंदा तलाव, जांभळी नाका, भाजी मार्केट परिसर तसेच टेंभीनाका परिसराची सफाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान पदपथावरील ५७ अतिक्रमणे काढले असून पदपथ मोकळा करण्यात आला, तसेच रस्त्यावरील १९ हातगाड्या व ४३ फेरीवाल्यांचे साहित्य जप्त करण्यात आले असून सदरचा परिसर नागरिकांसाठी मोकळा करण्यात आला.

### वेचक

## नागरिकांच्या कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी घेतली "जनसूनवाई"

**कल्याण :** नागरिकांच्या मूलभूत अधिकार, मालमत्तेचे अधिकार व आदिवासी, दलित व अल्पसंख्याक यांच्या अधिकाराबाबत जनजागृती करण्यासाठी आणि कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत किसळ - पारगाव, किरीट पी. मेहता स्कूल ऑफ लॉं व लीगल ऐड अँड सपोर्ट सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालय किसळ येथे "जनसुनावणी" या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात लीगल ऐड अँड सपोर्ट सेंटरच्या टीमच्या वतीने नागरिकांच्या मूलभूत अधिकार, मालमत्तेचे अधिकार व आदिवासी, दलित व अल्पसंख्याक यांच्या अधिकाराबाबत माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित नागरिकांच्या जमीन मालकी हक्क, वन हक्क, कौटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा व इतर महत्त्वाच्या कायदेविषयक समस्या उपस्थित वकील महोदय यांनी जाणून त्यांचे निराकरण केले. या कार्यक्रमाला एकूण ५० नागरिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे संयोजन सरपंच डॉ. कविता वरे यांनी केले होते. ग्रामपंचायत सदस्य सुनिल पडवळ, सदस्या वैष्णवी पडवळ, पेसा मोबिलायझर निशा पारधी, माजी उपसरपंच हरिश्चंद्र पडवळ तसेच किरीट पी. मेहता स्कूल ऑफ लॉच्या प्राध्यापिका डॉ. अनु मिश्रा व विद्यार्थी आणि लीगल ऐड अँड सपोर्ट सेंटरचे नामांकीत वकील रिशब मिश्रा व सदस्य उपस्थित होते.

## केडीएमसी प्रशासनाच्या अनुचित कामगार प्रथेविरूद्ध आक्रोश निदर्शने



**कल्याण :** औद्योगिक न्यायालय, ठाणे यांनी ८७ कचरा वाहतूक वाहन चालकांना पुर्वगामी परिणामाने कायम करून नियमित सेवेत असलेल्या कामगारांचे वेतन व लाभ देण्याचा आदेश दिलेला असतांनाही सातत्याने २०१२-२०१३ सालापासून आजतागायत कंत्राटी पद्धतीने तुटपुंज्या ठोक पगारावर काम करून घेऊन अनुचित कामगार प्रथेचा अवलंब सुरू ठेवलेला आहे. महापालिकेच्या या अन्यायकारक वर्तणुकीविरूध्द त्रस्त कामगारांनी आज कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयासमोर निदर्शने केली. ८७ कचरा वाहतूक वाहन चालकांना वाहनचालक संवर्गातील म. न.पा. कर्मचाऱ्यांप्रमाणे "समान कामाला समान वेतन" या सर्वमान्य तत्त्वाप्रमाणे वेतन व सवलती मिळाल्या पाहिजेत. कचरा वाहतूक कंत्राटी वाहनचालकांना ठोक पगाराऐवजी ७ व्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन, भत्ते, गणवेश, बोनस, पेन्शन व इतर लाभ मिळाले पाहिजेत. या मागण्यांसाठी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे महाराष्ट्र उपाध्यक्ष उदय चौधरी यांच्या नेतृत्वाखाली या कामगारांनी आंदोलन केले. उपायुक्त वंदना गुळवे यांच्याकडे कामगारांच्या या मागण्या मांडल्या असून या संबंधित सर्व अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक बोलविण्याची मागणी केली असून याबाबतचे पत्र केडीएमसीच्या वतीने देण्यात आल्यानंतर कामगारांनी आपले आंदोलन मागे घेतले.

## विजेच्या कडकडाटांसह शहापुरात जोरदार पाऊस

**शहापूर :** विजेच्या कडकडाटांसह आलेल्या परतीच्या पावसामुळे शेतातील कापलेले भात पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे, तर दुर्गा भक्तांमध्ये नाराजी पसरली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात दुपारी तीन वाजल्यापासून विजांच्या कडकडाटांसह पावसाने जोरदार सुरुवात केली. विजेंचा गडगडाट व पाऊस यामुळे सर्वांचीच धावपळ झाली. एकीकडे नवरात्रोत्सव उत्सव व शेतकऱ्यांची भात कापणी तयारी असतानाच अचानक आलेल्या पावसामुळे नवरात्रोत्सव मंडळं व भक्तांमध्ये नाराजी पसरली, तर शेतकऱ्यांच्या भात पिकांचं नुकसानीची भीती निर्माण झाली असल्याने त्यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले. तसेच यामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिक व रोजगार धंदा करणारे विक्रेत्यांची तारांबळ उडवून नुकसानीला सामोरे जावे लागले. कामानिमित्ताने ये-जा करणाऱ्या नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांची गैरसोय झाली.

# मुरबाड तालुक्याला चक्रीवादळाचा तडाखा; ८५० घरांचे मोठे नुकसान

### महावितरण कंपनीची मोठी हानी; २५० विद्युत खांब्यांसह झाडे पडली

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

निसर्ग कोपल्यानंतर काय करू शकतो याची प्रचिती मुरबाड तालुक्यातील जनतेला काल रात्रीच्या सव्वादहाच्या सुमारास चक्रीवादळाच्या तडाख्याने तालुक्यातील अनेक भागात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे स्थानिक प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यात ८५० घरावरील सिमेंट पत्रे, कौले, घोणे उडून मोठ्या प्रमाणात अंशतः बाधित झाले असल्याची माहिती मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी दिली आहे. मागील आठवड्यातच मुरबाड तालुक्याच्या विविध भागात परतीच्या पावसाचा तडाका बसून भात शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते ते नुकसान सोसण्याची वेदना सोसत असतानाच तोच मंगळवारी रात्री मुरबाड तालुक्याच्या विविध भागाला चक्रीवादळाने दिलेल्या तडाख्यात वीज मंडळाच्या नुकसानीसह मुरबाड शहरासह ग्रामीण भागातील घरावरील कौले, सिमेंट पत्रे, घोणे, तर कोंडे साखरे येथील सुरेश शिंदे यांच्या पोल्ट्री फार्मचे शेड उडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती



समोर आले आहे या घडलेल्या चक्रीवादळाच्या भीतीपोटी मुरबाड तालुक्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे तसेच बुधवारीसुद्धा पावसाची रिपरिप चालूच होती.

मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी तत्काळ पंचनामा करण्यासाठी बारा पथके नेमली आहेत अशी माहिती तहसीलदार कार्यालयांतून देण्यात आली आहे. शेतकऱ्यांचेही हाता-तोंडाशी आलेले भात पीक आडवे झाल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे शेतकरी वर्गाकडून सांगण्यात आले. अनेक गावातील विजेचे खांब पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे खंडित झालेला वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी वीज मंडळाचे कर्मचारी व अधिकारी युद्ध पातळीवर काम करीत असल्याचे वीज मंडळाचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे व बदलापूरचे डिव्हिजनचे कार्यकारी अभियंता आंनद काटकर यांनी घटनास्थळी येऊन प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. व कल्याण परिमंडल झोनचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली मुरबाड महावितरण कंपनीच्या सर्व अधिकारी वर्गासोबत चर्चा करून कोणत्याही परिस्थितीमध्ये खंडीत झालेल्या वीज पुरवठा कसा सुरलित करता येईल अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत, तर मुरबाड महावितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता केतन थत्ते त्यांनी सांगितले की युद्ध पातळीवर शंभर कर्मचारी वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी काम करत आहेत.

■ मुरबाडमध्ये तसेच शहरांमध्ये चक्रीवादळाच्या तडाख्यात मुरबाड महावितरणाचे सर्वात मोठे नुकसान झाले आहे.
■ प्रत्यक्ष पाहणी करून सर्व महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना देण्यात देण्यात आले आहेत की कोणत्याही परिस्थितीत युद्धपातळीवर वीज पुरवठा सुरु करण्यात यावा.
■ मुरबाड औद्योगिक क्षेत्रामध्ये विद्युत पोल तसेच झाडे मोठ्या प्रमाणात उन्मळून पडली आहेत.

### सर्वाधिक जागा लढवण्याचा मानस

# जिल्ह्यात मोठा भाऊ बनण्याचे भाजपाचे स्वप्न!

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

लोकसभा निवडणुकीनंतर हरियाणा आणि जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या निवडणुकीत हरियाणामध्ये भाजपाला एक हाती सत्ता मिळाली आहे. त्यामुळे भाजपाच्या गोटात आनंद व्यक्त होत असताना महाराष्ट्रात देखील भाजपाचा वरचष्मा रहावा या दृष्टीने राजकीय फिल्डींग लावली जात आहे. प्रत्येक जिल्ह्यातून भाजपाच्या जास्तीत जास्त जागा निवडून येतील हाच प्रयत्न भाजपाचा रहाणार आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांचे वर्चस्व असणाऱ्या ठाणे जिल्हा देखील भाजपाच्या हातात हवा आहे. यासाठी सर्वाधिक जागा लढवण्यासाठी भाजपा मानस आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार खालसा करून शिंदे गटासोबत सत्तेत आलेल्या भाजपाने आगामी विधानसभा निवडणुकीत स्वबळावर पुन्हा सत्तेत येण्याची रणनीती तयार करण्यास सुरुवात केली आहे .

पूर्वी भाजपाचा बालेकिल्ला असणारा ठाणे जिल्हा हा शिवसेनेने काबीज केला. अशातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्याची शिवसेनेची पकड आणखीनच घट्ट करत, जिल्ह्यात झालेल्या लोकसभा, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यामध्ये घवघवीत यश



मिळाले होते, तर कल्याण-डोंबिवली महापालिकेत शिवसेना भाजपा स्वतंत्रपणे लढले विशेष म्हणजे त्या निवडणुकीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या निवडणुकीत लक्ष घातले होते मात्र तरी शिवसेनेला चांगले यश मिळाले तसेच अंबरनाथ, बदलापूर, मुरबाड, शहापूर नगरपालिकेची निवडणूक, ठाणे महापालिकेच्या निवडणुकीतही शिवसेना आणि भाजपा एकमेकांच्या समोर उभे ठाकले असताना शिवसेनेने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली चांगले यश मिळवले. ठाण्याच्या जिल्हा परिषदेत शिंदे यांच्या नेतृत्वाखालीच शिवसेनेने इतिहासात पहिल्यांदा बहुमत मिळवले . त्यानंतर झालेल्या पालघर लोकसभा पोटनिवडणुकीत शिवसेनेशी तुल्यबळ लढत देत भाजपाने पोटनिवडणूक जिंकली. पालघर आपल्याकडे खेचण्याची राजकीय खेळी एकनाथ शिंदे यांनी केली. सर्वच पातळीवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यात शिंदे यांच्या नेतृत्वाखाली यश मिळाले.

## आर्य ग्लोबल ग्रुपतर्फे मातृ-पितृ पूजन बांधिलकी

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

आई ही सर्व पवित्र स्थानांची पूजा आहे आणि पिता हा सर्व देवांचा स्वभाव आहे, म्हणून मनापासून पूजन केले पाहिजे. हे महत्त्व जाणून आर्य गुरूकुल सीबीएसई, नांदिवली, कल्याण (पू) आणि अंबरनाथ (पू) यांनी मातृ-पितृपूजन उत्साहात आणि जल्लोषात साजरे केले. ज्यांनी प्रेमाचा खरा अर्थ शिकवला, ज्यांनी बिनशर्त प्रेम केले, त्यांच्याबद्दल कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त केले. आयुष्यभर म्हणजेच पालक. मातृ-पितृपूजन हा सर्वात प्रिय व्यक्ती यांच्यातील खऱ्या स्वरूपात प्रेमाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. या प्रसंगी २५० हून अधिक पालक आणि विद्यार्थ्यांचा एक जबरदस्त मेळावा दिसला ज्यांनी पालकांच्या



आदराची आपली प्राचीन परंपरा पुनरुज्जीवित करण्यासाठी आणि साजरी करण्यासाठी एकत्र जमले होते. दरवर्षी शाळेत नवरात्रीच्या काळात मातृ-पितृपूजन साजरे केले जाते. मातृ-पितृपूजनाचा दिव्य विधी चिन्मय मिशन, ठाणेच्या आचार्य स्वामिनी अनघनंद यांच्या हस्ते पार पडला. या उत्सवात मातांच्या निःस्वार्थ बिनशर्त प्रेमाची स्तुती करणारे पवित्र आणि स्वर्गीय, 'मातृस्तवनम श्लोक' समाविष्ट होते. पूजेनंतर गरबा हा नृत्य प्रकार होता. हेच वर्तुळाचे प्रतीक आहे.

## महापालिकेच्या बसमध्ये प्रवाशांना यूपीआय सेवा उपलब्ध

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महापालिका परिवहन सेवेच्या बसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता ऑनलाइन पेमेंट अर्थात यूपीआय पेमेंट करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे सुट्ट्या पैशांच्या कटकटीतून बस वाहक आणि प्रवासी या दोघांनाही मुक्तता मिळणार आहे.

मीरा-भाईंदर महापालिका परिवहन सेवेच्या ९० बस प्रवाशांच्या सेवेत आहेत. या बसमधून रोज एक लाख प्रवासी प्रवास करत असतात. अनेकवेळा सुट्ट्या पैशांवरून प्रवासी आणि बसवाहक यांच्यात वाद होतात. त्यामुळे परिवहन सेवेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांसाठी



ऑनलाइन पेमेंट सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी गेल्या काही दिवसांपासून जोर धरू लागली होती. त्यानुसार सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या होत्या. परिवहन विभागाने सातत्याने चाचण्या करत क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात आले आहे. ऑनलाईन पेमेंटच्या चाचणीसाठी मागील आठवड्यात पाच बसेसना क्यू आर कोड उपलब्ध करून देण्यात आले होते. या चाचणीमध्ये क्यू आर कोड मार्फत महापालिकेच्या खात्यामध्ये प्रवाशांनी केलेल्या ऑनलाईन पेमेंटचे पैसे जमा होत आहेत की नाही याची खातर जमा करण्यात आली. ही चाचणी यशस्वीरित्या पार पडल्यामुळे ६० बसना क्यू आर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून पुढील २ दिवसांत सदर सेवा सर्व बस मध्ये उपलब्ध होणार आहे. प्रवाशांनी या डिजिटल सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांनी केले आहे.

## लाचलुचपत प्रकरणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अटकेत

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

एनआरआय सागरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांना बेलापूर येथील एका बांधकाम व्यावसायिकाकडून ४ लाख रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या मुंबई युनिटने मंगळवारी रात्री रंगेहात पकडले. सतीश कदम यांनी या बांधकाम व्यावसायिकाला वेगवेगळ्या गुह्यात अडकवण्याची भीती दाखवून त्याच्याकडे ५० लाख रुपये लाचेची मागणी करून त्याच्याकडून १४ लाख रुपये उकळले होते. या कारवाईनंतर नवी मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे. गत जुलै महिन्यामध्ये बेलापूर येथील शहाबाज गावात इंदिरा निवास इमारत कोसळली होती. या प्रकरणात एनआरआय पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक महेश कुंभार याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांनी महेश कुंभार याला विविध गुह्यात अडकवून त्याच्यावर गंभीर कलमे लावण्याची धमकी दिली होती.

तसेच या प्रकरणातून वाचण्यासाठी कदम यांनी ५० लाख रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती कुंभार याने १८ लाख रुपये देण्याची तयारी दर्शविल्यानंतर महेश कुंभार यांचा मुलगा अजय कुंभार याने २ लाख रुपये सतीश कदम यांना दिले होते. यादरम्यान, एनआरआय पोलिसांनी कुंभार याच्या विरोधात एका महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. या गुह्यात सतीश कदम यांनी पाच लाख रुपयांची मागणी केली होती. मात्र कुंभार याच्या मुलाने चार लाख रुपये देण्याची तयारी दर्शवून सतीश कदम यांच्या विरोधात थेट मुंबई येथील ॲन्टी करफ्शन ब्युरोच्या कार्यालयात तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या आनुषंगाने सतीश कदम यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मंगळवारी रात्री लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावला होता. रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास सतीश कदम यांनी उलवे येथील राहत्या घरी अजय कुंभार याच्याकडून ४ लाख रुपयांची लाच स्विकारल्यांनतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले.

## तानसा अभयारण्यात वन्यजीव सप्ताह



◆ **शहापूर (वार्ताहर) :**

तानसा अभयारण्यात वन्यजीव सप्ताह निमित्ताने वन्यजीव संरक्षण वळांचे संरक्षण आदी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. अभयारण्य परिसरातील पिवळी, अघई, तानसा , कलमगाव-पेंढरी येथील विविध शाळा, महाविद्यालये, आणि गावांमध्ये वन्यजीव विषयक सादरीकरणे, चित्रकला, निबंध, वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून यासंदर्भात वन्यजीव अभ्यासक आऊळ कजर्वेशन फौंडेशन बरोबर हृषीकेश घोगरे, रोहिदास डगळे, प्रशांत शिराळ, चैतन्य किर, वंदना शिराळ, तुषार दुधाळे, अर्जुन बराळ यांनी व्याख्याने, चित्रफिती, पीपीटी सादरीकरण या उपक्रम माध्यमातून जनजागृती करण्यात आली अशी माहिती वनक्षेत्रपाल रमेश रसाळ यांनी दिली. तसेच या सप्ताहाचा समारोप समारंभ आत्मामालिक ध्यानपीठ अघई येथे आयोजित करून यामध्ये वने व वन्यजीव संरक्षण, संवर्धनामध्ये योगदान देणाऱ्या वन अधिकारी वनकर्मचारी, सामाजिक संस्था, ग्रामपरिस्थितीकीय समित्या, सर्प मित्र, निसर्गमित्र इत्यादी ७०-७५ संस्था व व्यक्तींना त्यांचे कार्याबद्दल प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात वनक्षेत्रपाल रमेश रसाळ, वनपाल युसूफ शेख, विलास भेरे, समीर इनामदार, किसन चौधरी, दिलीप जाधव तसेच वनरक्षक संतोष खंदारे, प्रतीक्षा हरणे, संगीता बेनके, कोमल गायखे, जयश्री निरडे, दिघे माळी, बेनके, तारमळे, धांडे इत्यादी वन अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

## बॅनर फाडण्याचे प्रकार सुरूच

**कल्याण :** मागील १० वर्षांत आमदार असताना व नसताना देखील सातत्यपूर्ण सामाजिक कार्य केल्याने जनमानसात मी वेगळी ओळख निर्माण केली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना, विविध कार्यक्रम, उपक्रम, सण - उत्सव भाजपा व नरेंद्र पवार फाऊंडेशनच्या माध्यमातून कल्याण पश्चिम विधानसभा क्षेत्रात सुरू आहे. याबाबत कल्याण पश्चिम विधासभा क्षेत्रात अनेक चौकात बॅनर लावण्यात आले आहे. हे बॅनर फाडण्याचे प्रकार मानसिक विकृती असलेल्या काही महाभागांकडून सुरू आहेत. राजकीय व सामाजिक शांततेचा भंग करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

माध्यमिक शाळांची वेळ सकाळच्या सत्रात करण्यासह अन्य समस्या सोडण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या वेळी शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष तथा आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या अन्य पदाधिकारी उपस्थित होते. विविध मागण्यांच्या संदर्भात आयुक्तांसह झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती शिक्षक सेनेचे पदाधिकारी मधुकर वारभुवन यांनी दिली.

नवी मुंबई महानगर पालिका संचलित २३ माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये कार्यरत कायम सेवेतील शिक्षकांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. यामध्ये माध्यमिक. सध्या कार्यरत कायम सेवेतील माध्यमिक शिक्षकांपैकी सन २०११ मध्ये नियुक्त शिक्षकांना सन २००६ आणि २०२३ मध्ये नियुक्त शिक्षकांप्रमाणे पूर्ण वेतनश्रेणीवरील शिक्षक म्हणून मान्यता मिळावी, तसेच त्यांना शिक्षण सेवक कालावधीतील वेतन फरक मिळावा. १२ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या शिक्षकांना तत्काळ वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करावी. शासनाच्या नियमानुसार पर्यवेक्षक व इतर पदांना मंजुरी देऊन सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात यावी. नवी मुंबई मनपा माध्यमिक शिक्षण विभागाच्या समस्या सोडवण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात यावा. दिवंगत शिक्षक दिलीप कडू यांच्या पत्नी वनिता दिलीप कडू यांना अनुकंपा तत्त्वावर मनपा सेवेत सामावून घ्यावे आदी मागण्या प्रलंबित आहेत. या संदर्भात नुकतीच आयुक्त शिंदे यांच्या सोबत शिक्षक सेनेच्या पदाधिकारी यांची बैठक झाली यामध्ये शिंदे यांनी तत्काळ योग्य ते निर्णय घेण्याचे निर्देश शिक्षण विभागास दिले आहेत.

**व्यावसायिक-विक्रेत्यांची तारांबळ; शाळकरी विद्यार्थ्यांची गैरसोय**

### कांचन वृक्षाने घेतली आपट्याच्या पानांची जागा

# दसऱ्याला आपट्याच्या पानाऐवजी "कॅमलफूट ट्री पान"

**डॉ. प्रशांत सिनकर**

**ठाणे :** दसऱ्याला सोन म्हणून आपट्याची पान देण्याची प्रथा असली तरी, आपट्याचे पान (सोनं) आता डुप्लिकेट मिळू लागलं आहे. आपट्याच्या पानाप्रमाणे साधर्म्य दिसणारे कॅमलफूट ट्री (कांचन) या झाडाची पाने बाजारात विक्रीसाठी दिसतात. आपट्याची पाने आकाराने लहान आणि वृक्ष असतात, तर कांचन झाडाची पानं आकाराने मोठी आणि मुलायम असतात. आयुर्वेदात ही दोन्ही झाडं महत्त्वाची आहेत. मात्र सण उत्सवाच्या दरम्यान या झाडावर कुऱ्हाडीचे घाव घालून या झाडाचे अस्तित्त्वच नष्ट केले जाते आहे.

ग्रामीण भागातही आता शहरीकरणाचे वारे वाहू लागले आहेत, त्यामुळे जंगल परिसरालाही अतिक्रमणाचा वेढा पडला असून मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे. दुर्मिळवृक्षांची माहिती न घेताच ती सर्रास कत्तल होत आहे.

त्यामळे औषधी गुणधर्मांनी भरलेली झाडांची संख्या कमी होऊ लागली आहे. चांगले उदाहरण द्यायचे झालेच, तर विजयादशमी निमित्त वाटण्यात येणारे आपट्याच्या पानांची जागा आता दुसऱ्याच पानांनी घेतली आहे. आपट्याच्या पानासारखंच दिसणारे कांचन वृक्ष कुळातील कॅमलफूट ट्री या झाडाने घेतली आहे. आपट्याचे झाड हे जंगलात वाढत असून दसऱ्यानिमित्त आपट्याचीच पाने लुटण्याची परंपरा आहे.



**कॅमल फूट झाडाचं पान गुळगुळीत**

उद्यान शास्त्रात कांचन वृक्षाच्या अनेक प्रजाती आहेत, त्यापैकी आपटा हे जंगलातच वाढते, हे झाडं ठाणे जिल्ह्याबरोबर पश्चिम घाटात ही झाडं आढळतात. या झाडाला पाणी कमी लागत असून हे झाड रुक्ष आहे. पानंही आखुड गोलाकार आणि खरखरीत असतात, या उलट कॅमल फूट ट्री या झाडाची पाने आपट्याच्या पानापेक्षा आकाराने खूप मोठी असतात, तसेच पाने ही कोमल आणि गुळगुळीत असल्यामुळे ती सहज ओळखता येतात.

**पानांना उंटाच्या पायांचा आकार :** विजयादशमीच्या दिवशी बाजारात आपट्याच्या पानासारखीच दिसणारी कॅमल फूट ट्रीची पाने विकायला येतात. या पानांचा आकार हा उंटाच्या पायासाराखा असतो म्हणून त्याला कॅमल फूट ट्री हे नाव पडले आहे. ही झाडे उद्यानात किंवा पानठळ जागेत वाढवली जात असून बहूतांशी ठिकाणी आपट्याच्या झाडांऐवजी अशीच झाडे लावली जातात.

## हरियाणा विजयाचा ठाण्यात फटाके फोडून जल्लोष


◆ **ठाणे, (प्रतिनिधी) :**

हरियाणा तो झॉकी है...महाराष्ट्र अभी बाकी है अशी घोषणाबाजी करीत ठाण्यात भाजपाने विजयी जल्लोष केला. हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाने तिसऱ्यांदा बहुमताकडे वाटचाल सुरू केल्यावर ठाणे शहर भाजपाचे अध्यक्ष संजय वाघुले यांच्या नेतृत्वाखाली जल्लोष केला. भाजपाच्या वर्तकनगर येथील विभागीय कार्यालयाबाहेर फटाके फोडून पेढे वाटत आनंद व्यक्त करण्यात आला. हरियाणात सुरू झालेली विजयाची घोडदौड महाराष्ट्रातही कायम राहील, असा विश्वास भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी व्यक्त केला.

हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागांवर विजय मिळाला आहे. भाजपाची बहुमताकडे वाटचाल सुरू झाली. त्यानंतर भाजपाच्या ठाणे येथील विभागीय कार्यालयाबाहेर फटाके फोडून जल्लोष केला. फटाक्यांच्या आतषबाजीत कार्यालय परिसर जल्लोषमय वातावरणात न्हाऊन निघाला. संजय वाघुले यांनी या विजयानंतर हरियाणातील जनतेचे आभार मानत, हा विजय विकासाच्या ध्येयाचे प्रतीक असल्याचे सांगितले. त्यांनी ठाणेतील कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांमध्येही यशस्वी होण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात कार्यकर्त्यांनी पुढील निवडणुका आणि पक्षाच्या धोरणांवरही चर्चा केली. भाजपाच्या या विजयानंतर ठाण्यातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी निवडणुकांमध्ये पक्षाची ताकद वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या विजयोत्सवात माजी नगरसेविका आशा शेरबहादूर सिंह, भाजयुमो शहर अध्यक्ष सूरज दळवी, डॉ. समिरा भारती, सचिव सचिन पाटील, कैलास म्हात्रे, सचिन केदारी, तृप्ती पाटील, श्रुतिका कोळी - मोरेकर, मेघनाथ घरत, अमित पाटील, डॉ. किरण मणेरा, भानुदास भोईर आदीसह भाजपाच्या विविध प्रकोष्टचे प्रमुख, मंडल पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रतन टाटा यांचे १० प्रेरणादायी विचार

- आयुष्यात पुढे जाण्यासाठी चढ-उतार अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण ईसीजीमध्ये सरळ रेषेचा अर्थ असतो आपण जिवंत नाही.
- सत्ता आणि पैसा हे माझे सिद्धांत नाही.
- जर तुम्हाला वेगात चालायचे असेल तर एकटे चालत राहा, पण तुम्हाला दुरपर्यंत चालायचे असेल तर इतरांच्या बरोबर चला.
- लोखंडाला कोणीही नष्ट करू शकत नाही, पण त्याला त्याचा गंज नष्ट करू शकतो. त्याचप्रमाणे कोणत्याही व्यक्तीला इतर कोणीही नष्ट करू शकत नाही, त्याला त्याची मानसिकता नष्ट करते.
- लोक तुमच्यावर दगड फेकत असतील, तर ते उचला आणि त्याचा वापर एक स्मारक तयार करण्यासाठी करा.
- मी योग्य निर्णय घेण्यावर विश्वास ठेवत नाही, मी निर्णय घेतो आणि नंतर तो योग्य करून दाखवतो.
- ज्या दिवशी मी उडण्यास सक्षम नसेल तो दिवस माझ्यासाठी अत्यंत दुखी दिवस असेल.
- शेवटी आपल्याला अशा संधीसाठी पश्चाताप होतो ज्या आपण गमावतो. प्रत्येक छोटी संधी तुम्हाला मोठे बनवू शकते.
- सर्वात मोठे अपयश प्रयत्न न करणे हे आहे.
- गोष्टी नशिबावर सोडण्यावर माझा विश्वास नाही. माझा कठोर परिश्रम आणि तयारीवर विश्वास आहे.



"योग्य निर्णय घेण्यावर माझा विश्वास नाही. मी निर्णय घेतो आणि मग ते योग्य बनवतो."
"सत्ता आणि संपत्ती हे माझे दोन मुख्य भाग नाहीत."
– रतन टाटा



## रतन टाटा यांच्या बद्दल

जन्म : २८ डिसेंबर १९३७
वय : ८६ वर्षे
शिक्षण : कॉर्नेल विद्यापीठ
हार्वर्ड बिझनेस स्कूल
कुटुंब : नवल टाटा (वडील)

**व्यवसाय**

टाटा सन्स आणि टाटा समूहाचे माजी अध्यक्ष
मानद अध्यक्ष, एमेरिटस, टाटा सन्स आणि टाटा समूह
वारसा : जेआरडी टाटा

**पुरस्कार**

पद्मविभूषण (२००८)
पद्मभूषण (२०००)

# उद्योगविश्वातील महामेरू


भारतीय उद्योग विश्वात स्पर्धेबरोबरच सामाजिक जाणीव, आर्थिक फायद्याबरोबरच वंचितांच्या आयुष्यात बदल आणण्यासाठी प्रयत्न, सहवेदना, परोपकारी वृत्ती, प्राणीमात्रांवर पराकोटीचे प्रेम आणि माणसातले माणूसपण जपणारा माणूस या सगळ्या बाबींचे एक विलक्षण रसायन रतन टाटा यांच्यामध्ये तयार झाले होते. रतन टाटा यांच्या निधनामुळे भारतीय उद्योग विश्वाबरोबरच देशाच्या सामाजिक जाणिवेतही एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. समाजाच्या सर्वच स्तरातून त्यांच्या निधनावर शोक व्यक्त होत आहे.

देशातील सर्वात मोठे उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनामुळे संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे. रतन टाटा यांनी देशाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे, त्यामुळे प्रत्येक व्यक्ती त्यांचे नाव आदराने घेतात. कोट्यवधींचा व्यवसायाचे मालक असलेले रतन टाटा त्यांच्या माणुसकीसाठी देखील ओळखले जात होते.

## संगीतप्रेमी टाटा

रतन टाटा यांना ६० आणि ७०च्या दशकातील संगीत अधिक आवडते. बीटल्स त्यांना आवडते. शास्त्रीय संगीताचे ते भोक्ते होते. त्यांना शॉपेन, सिम्फनी आवडते. तसेच बिथोवन आणि चेकोस्कीही आवडतात. पण त्यांची पियानो वाजविण्याची एक इच्छा अपूर्णच राहिली. कामाच्या व्यस्ततेमुळे राहून गेले.

रतन टाटा हे सिनेमे पाहायचे. पण थिएटरमध्ये कधी जात नव्हते. त्यांना घरीच टीव्हीवर सिनेमे पाहायला आवडायचे. पण कोणते सिनेमे पाहिले त्याची नावे मात्र त्यांना आठवत नसायची. वाचकांसाठी त्यांनी एक पुस्तक सुचवलं होते.



## टाटा सन्सच्या अध्यक्षपदाची रतन टाटांकडे धुरा

- १९९१ मध्ये जेआरडी टाटा हे टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाले तेव्हा त्यांनी रतन टाटा यांना त्यांचे उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. अनेक दशके आपापल्या कंपन्यांमध्ये घालवलेल्या अनेक कंपन्यांच्या प्रमुखांकडून त्यांना कठोर प्रतिकाराचा सामना करावा लागला. टाटांनी निवृत्तीचे वय ठरवून त्यांची जागा घेण्यास सुरुवात केली. त्यांनी पुढे प्रत्येक कंपनीला समूह कार्यालयात अहवाल देणे बंधनकारक केले. त्यांच्या नेतृत्वाखाली, टाटा सन्सच्या आच्छादित कंपन्या एकत्रित केल्या गेल्या.
- ब्रिटिश काळात बॉम्बे या शहरात (सध्याचे मुंबई) येथे जन्मलेले रतन टाटा हे नवल टाटा आणि सुनी कमिशनर यांचे पुत्र आहेत. रतन टाटा १० वर्षांचे असताना ते वेगळे झाले. त्यानंतर त्यांना त्यांची आजी नवजबाई टाटा यांनी जेएन पेटिट पारसी अनाथाश्रमातून औपचारिकपणे दत्तक घेतले. रतन टाटा यांचे सावत्र भाऊ नोएल टाटा (नवल टाटा आणि सिमोन टाटा यांचा मुलगा) यांच्यासोबत वाढले होते.
- कॅम्पियन स्कूल, मुंबई, कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, मुंबई, बिशप कॉटन स्कूल, शिमला आणि न्यूयॉर्क शहरातील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये शिक्षण घेतले. ते कॉर्नेल विद्यापीठ आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे माजी विद्यार्थी आहेत.

## टाटा ग्रुपमध्ये रतन टाटांची प्रशिक्षणार्थी कामगार म्हणून सुरुवात; मेहनत अन् सचोटीने बनले साम्राज्याचे चेअरमन

देशातील दिग्गज व्यावसायिक अन् टाटा ग्रुपचे चेअमरन रतन टाटा असेच मोठे झाले नाहीत. टाटांच्या घरात जन्म झाला तरी त्यांना स्वत:ला सिद्ध करावे लागले. त्यासाठी कंपनीत साधारण कामगार म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. कंपनीतील कामगार ते टाटा समूहाचे चेअरमन बनण्याची त्यांची यशोगाथा केवळ मेहनत अन् सचोटीची आहे.

## 'आजीने केला सांभाळ, ते पहिली नोकरी'

जमशेदजी टाटांचे बंधू रतनजी टाटा यांचा विवाह नवजबाई सेठ यांच्याशी झाला. अर्देशीर मेरवानजी सेठ यांच्या त्या धाकट्या कन्या होत्या. १९१५ मध्ये जोडपे इंग्लंडला स्थायिक झाले. जिथे त्यांनी समाजसेवेसाठी सर्वस्व झोकून दिले. भारतात आल्यावर त्यांना नवल यांना दत्तक घेतले. अशा प्रकारे नवजबाई सेठ या रतन टाटांच्या आजी होत्या. रतन टाटा हे अवघे १० वर्षांचे असताना त्यांच्या आई वडिलांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर १९४० पासून रतन टाटा यांच्या आजीनेच त्यांचा सांभाळ केला. टाटा स्टील्समध्ये रतन टाटा यांना पहिल्यांना नोकरी मिळाली तेव्हा चुनखडी आणि स्फोट भट्टीची जबाबदारी देण्यात आली होती. १९६१ साली त्यांनी टाटा कंपनीमध्ये काम करण्यास सुरुवात केली. २००७ साली रतन टाटा हे पहिले सामान्य भारतीय ठरले होते, ज्यांनी एफ-१६ फाल्कन हे विमान उडवले होते. एका अमेरिकन वैमानिकाबरोबर सहवैमानिक म्हणून रतन टाटांनी ४० मिनिटे हे विमान उडवले होते. हा कारनामा त्यांनी एरो इंडिया शोमध्ये केला होता.

## जेआरडी यांनी मुंबईत बोलवून घेतले

१९६२ मध्ये रतन टाटा यांनी जमशेदपूरमधील टाटा स्टीलमध्ये कामाला सुरुवात केली. त्या ठिकाणी त्यांनी सहा वर्षे काम केले. कामाची सुरुवात त्यांनी निळ्या रंगाचे ओव्हरॉल्स परिधान करून शॉपफ्लोर वर्कर म्हणजे कामगार म्हणून केली. त्यानंतर त्यांना प्रोजेक्ट मॅनेजर बनवण्यात आले. काही काळाने ते कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक एस. के. नानावटी यांचा विशेष सहाय्यक बनले. त्याच्या मेहनतीची चर्चा जेआरडी टाटा यांच्यापर्यंत गेली. मग जेआरडी टाटांनी त्यांना मुंबईला बोलावले. त्यांना ऑस्ट्रेलियात वर्षभरासाठी पाठवले.

## आवडते खेळ

टाटा यांना फुटबॉल, टेनिस आणि गोल्फ पाहणं आवडायचं पण फक्त टीव्हीवर. या खेळांमध्ये कोणता खेळाडू खेळतोय हे मला माहीत नसतं. पण मी त्या खेळाडूंच्या क्षमतेकडे पाहत असतो. त्याचा आनंद घेतो, असे टाटांनी म्हटले होते.

## लग्नाची अधुरी कहाणी...

रतन टाटा यांचे चार वेळा लग्न होता होता राहिले. एकदा तर त्यांचे लग्न होता होता राहिले. त्यावेळी रतन टाटा अमेरिकेत होते. त्यांच्या आजीने त्यांना फोन करून बोलावले होते. त्यावेळी भारत आणि चीनचे युद्ध सुरू होते. त्यामुळे रतन टाटा यूएसमध्ये अडकले होते. त्यामुळे त्या मुलीचे घरचे थांबले नाहीत. त्यांनी दुसरीकडे मुलीचे लग्न लावून दिले. मात्र, काही काळानंतर या मुलीच्या पतीचे निधन झाले. काही वर्षांपूर्वी टाटा एकदा बॉम्बे हाऊसच्या ऑफिसमध्ये बसले होते. तेव्हा एका व्यक्तीने टाटांना चिठ्ठी दिली. पॅरिसमधून एका मुलीने ही चिठ्ठी पाठवली होती. ही चिठ्ठी त्याच मुलीची होती, जिच्याशी त्यांचे लग्न होऊ शकलं नव्हतं. त्या मुलीचे कुटुंब आहे. तिला एक मुलगाही आहे. त्यानंतर रतन टाटा आणि या महिलेमध्ये चांगली मैत्री झाली होती.

## रतन टाटांचे कमालीचे कार्य

रतन टाटांचा २१ वर्षांच्या कार्यकाळात टाटा सन्सचा महसूल ४० पटीने वाढला आणि नफा ५० पटीने वाढला. त्यांनी टाटा टीला टेटली, टाटा मोटर्सला जग्वार लँड रोव्हर आणि टाटा स्टीलचे अधिग्रहण करण्यासाठी कॉरसचे नेतृत्व केले आणि संस्थेचे मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्रित समूहातून जागतिक व्यवसायात रूपांतर केले.

टाटा नॅनो कारची संकल्पनाही त्यांनी तयार केली. या कारची किंमत सरासरी भारतीय ग्राहकांच्या आवाक्यात होती, त्यामुळे याला भरभरून प्रतिसाद मिळाला.

शिक्षण, औषध आणि ग्रामीण विकासाचे समर्थक असल्याने, रतन टाटा यांनी आव्हानात्मक भागात चांगले पाणी उपलब्ध करून देण्यासाठी न्यू साऊथ वेल्स विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विद्याशाखेला पाठिंबा दिला.

टाटा एज्युकेशन अँड डेव्हलपमेंट ट्रस्टने $ २८ दशलक्षचा टाटा शिष्यवृत्ती निधी दिला आहे, ज्यामुळे कॉर्नेल विद्यापीठाला भारतातील पदवीधर विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य करता येईल. वार्षिक शिष्यवृत्ती दिलेल्या एका वेळी अंदाजे २० विद्यार्थ्यांना सहाय्य प्रदान करेल.

टाटा समूहाच्या कंपन्या आणि टाटा धर्मादाय संस्थांनी २०१० मध्ये हार्वर्ड बिझनेस स्कूलला कार्यकारी केंद्राच्या बांधकामासाठी $५० दशलक्ष देणगी दिली.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने कॉग्निटिव्ह सिस्टम आणि स्वायत्त वाहनांच्या संशोधनासाठी कार्नेगी मेलॉन युनिव्हर्सिटीला $३५ दशलक्ष देणगी दिली. कंपनीने दिलेली ही सर्वात मोठी देणगी आहे आणि ४८,००० चौरस फूट इमारतीला टीसीएस हॉल म्हणतात, टाटा समूहाने २०१४ मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बॉम्बेला ९५० दशलक्ष रुपयांची देणगी दिली आणि टाटा सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अँड डिझाइनची स्थापना केली. संस्थेच्या इतिहासात मिळालेली ही सर्वात मोठी देणगी होती.

टाटा ट्रस्टने अल्झायमर रोगाच्या कारणास्तव अंतर्निहित यंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याचे लवकर निदान आणि उपचारांसाठी पद्धती विकसित करण्यासाठी न्यूरोसायन्स सेंटर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सला ७५० दशलक्ष रुपयांचे अनुदान देखील दिले. टाटा समूहाने मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे एमआयटी टाटा सेंटर ऑफ टेक्नॉलॉजी अँड डिझाईनची स्थापना देखील केली आहे, ज्यामुळे भारतावर प्राथमिक लक्ष केंद्रित करून संसाधन-अवरोधित समुदायांच्या आव्हानांना सामोरे जावे लागेल.

## या अडचणीत आलेल्या कंपन्यांची दिली जबाबदारी



जेआरडी टाटा यांनी त्यांना अडचणीत आलेली कंपनी सेंट्रल इंडिया मिल आणि नेल्कोमध्ये सुधारणा करण्याची जबाबदारी दिली. त्यांच्या नेतृत्वात तीन वर्षांत नेल्कोचे कायापालट झाले. कंपनी नफ्यात आली.

त्यानंतर १९८१ मध्ये जेआरडी टाटा यांनी रतन टाटा यांना टाटा इंडस्ट्रीजची कमान दिली. या कंपनीचे टर्नओव्हर फक्त ६० लाख होते. परंतु तिचे महत्त्व होते. कारण स्वत: जेआरडी ही कंपनी पाहत होते.

## "कारमधले कळत नाही तर कशाला कंपनी सुरू करायची" फोर्ड कंपनीच्या मालकाने रतन टाटांचा केला होता अपमान



भारतीय उद्योगजगताचे शिल्पकार आणि टाटा ग्रुपचे प्रमुख रतन टाटा यांच्या जीवनातील अनेक प्रेरणादायी गोष्टी आहेत. त्यातच आता रतन टाटा यांनी एका अपमानाचा बदला घेतल्याचा किस्सा आहे.

रतन टाटा यांनी देशाच्या प्रेमापोटी इंडिका नावाची गाडी बाजारात आणली. पण ही कार भारतीय बाजारात फारशी चमक दाखवू शकली नाही. यामुळे टाटा मोटर्सला मोठा आर्थिक फटका बसला. यानंतर टाटांना अनेक सहकार्यांनी विभाग बंद करण्याचा सल्ला दिला. रतन टाटा यांनाही हा सल्ला पटला. त्यानंतर त्यांनीही १९९९ टाटा मोटर्स विकण्याचा निर्णय घेतला. यानंतर रतन टाटा हे अमेरिकेतील फोर्ड कंपनीच्या मालकाला भेटण्यासाठी गेले. यावेळी फोर्ड कंपनीचा मालक आणि रतन टाटा यांची भेट घेतली. त्या दोघांमध्ये तीन तास चर्चा झाली. या चर्चेनंतर रतन टाटांना सांगण्यात आले की, जर तुम्हाला कारमधले काहीही कळत नसेल तर मग तुम्ही अशी कंपनी सुरूच कशाला करायची. जर आम्ही ही कंपनी विकत घेतली तर हे तुमच्यावर खूप मोठे उपकार असतील, असे फोर्डकडून सांगण्यात आले. हे ऐकल्यानंतर टाटांना खूप अपमानास्पद वाटले.

जॅग्वार, लँड रोव्हर या कार कंपन्या विकत घेतल्या.

यानंतर त्यांनी कार प्रोडक्शन विभाग खूप मेहनतीने आणि लक्षपूर्वक चालवण्याचा निर्णय घेतला. यानंतर २००८ पर्यंत टाटांचा वाहन निर्मिती व्यवसाय प्रचंड मोठा झाला होता. २००८ साली अमेरिकेमध्ये मंदीची मोठी लाट आली. या लाटेत फोर्डला मोठा फटका बसला. फोर्ड कंपनीवर जॅग्वार आणि लँड रोव्हर या कंपन्या विकण्याची वेळ फोर्डवर आली होती. जॅग्वार, लँड रोव्हर या आलिशान कार कंपन्या विकत घेण्यासाठी टाटांनी बिल फोर्ड यांना ऑफर दिली. यावेळी रतन टाटांसोबतच्या बैठकीसाठी बिल फोर्ड अमेरिकेतून भारतात आले. या दोघांमध्ये सविस्तर चर्चा पार पडली. डील यशस्वी झाली. रतन टाटांनी फोर्डकडून जॅग्वार, लँड रोव्हर या २ कंपन्या २.३ अब्ज डॉलर्सला विकत घेतल्या. यावेळी मात्र फोर्ड कंपनीने रतन टाटांचे कौतुक केले. ''तुम्ही आमची कंपनी विकत घेऊन आमच्यावर फार उपकार केले.'' अशी प्रतिक्रिया त्यावेळी फोर्ड यांनी व्यक्त केली. जॅग्वार, लँड रोव्हर या कंपनीच्या खरेदीमुळे टाटा आणि फोर्ड यांच्यातील व्यवहाराची जगभरात चर्चा झाली होती. सध्या लँड रोव्हरच्या कार जगभरात सर्वाधिक विक्री होणाऱ्या कारच्या यादीत आहेत.



## टाटा सन्सची यशस्वी वाटचाल

रतन टाटा यांनी मार्च १९९१मध्ये टाटा सन्सचे अध्यक्षपद स्वीकारले आणि २८ डिसेंबर २०१२ रोजी निवृत्त झाले. त्यांच्या कार्यकाळात टाटा समूहाचा महसूल अनेक पटींनी वाढला. हा महसूल १९९१मध्ये फक्त १० हजार कोटी रुपयांच्या उलाढालीवरून २०११-१२मध्ये यूएस$ १००.०९ अब्ज इतका वाढला.

२००० मध्ये टाटा टीकडून यूएसS$४५० दशलक्षमध्ये टेटली, २००७ मध्ये ६.२ बिलियनमध्ये टाटा स्टीलकडून पोलाद निर्माता कोरस आणि २००८ मध्ये २.३ बिलियनमध्ये टाटा मोटर्स यासह काही महत्त्वपूर्ण संपादनांद्वारे त्यांनी समूहाचे नेतृत्व केले. ऐतिहासिक जग्वार लँडचा कंपनीत समावेश आहे.

निवृत्तीनंतर टाटा यांना त्यांचे उत्तराधिकारी सायरस मिस्त्री यांच्याशी बोर्डरूम युद्धाचा सामना करावा लागला. मिस्त्री यांना २४ ऑक्टोबर २०१६ रोजी टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून काढून टाकण्यात आले. मिस्त्री यांना हटवल्यानंतर ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष म्हणून परत आले. त्यानंतर जानेवारी २०१७ मध्ये टाटा समूहाचे नेतृत्व एन. चंद्रशेखरन यांना देत रतन टाटा यांनी टाटा सन्सच्या मानद अध्यक्षपदाची भूमिका स्वीकारली.



## चेअमनपदाच्या शर्यतीत नव्हतेच अन्...

- जेव्हा जेआरडी ७५ वर्षांचे झाले, तेव्हा त्यांनी उत्तराधिकारीची निवड करण्याचा निर्णय घेतला. मग नानी पालखीवाला, रूसी मोदी, शाहरुख साबवाला आणि एचएन सेठना यांच्यातील कोणातरी उत्तराधिकारी बनवणार, असे रतन टाटा यांना वाटत होते; परंतु रतन टाटा यांची निवड झाली. २५ मार्च १९९१ रतन टाटा समूहाचे चेअरमन बनले.
- भारतात जेव्हा कोविड महामारी पसरली तेव्हा रतन टाटा यांनी तत्काळ टाटा ट्रस्टकडून ५०० कोटी रुपये आणि टाटा कंपन्यांच्या माध्यमातून १००० कोटी रुपये दिले. महामारी आणि लॉकडाऊनच्या आर्थिक परिणामांना सामोरे जाण्यासाठी त्यांनी हा निधी दिला.

# बीड मतदार संघाच्या विकासाचे व्हिजन!

**डॉ.योगेश क्षीरसागर** अजितदादा,धनुभाऊंमुळे विकासाला गती





बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघासाठी मला निधी मिळत नाही म्हणून बीडच्या आमदारांचे सतत रडगाणे सुरू होते. परंतु त्यांना जे जमले नाही, ते राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी वर्षभरातच करून दाखविले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर वर्षभरातच उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून एका वर्षातच २५ कोटींहून अधिकचा निधी आणत बीड मतदारसंघाच्या विकासाचे व्हिजन असल्याचे दाखवून दिले आहे.

थेट राज्य शासनाच्या विभागाकडून आणि जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून आतापर्यंत बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागासाठी पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात २ असा एकूण ५ कोटी रुपयांचा निधी मिळाला. शहरी भाग व प्रमुख गावांसाठी पहिल्या टप्प्यात ६ व दुसऱ्या टप्प्यात ७ असा १४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला. तसेच, मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रातील विकासासाठी शासनाने भरीव तरतूद केली. या योजनेतून पहिल्या टप्प्यात ३ व दुसऱ्या टप्प्यात ४ असा एकूण ७ कोटी रुपयांचा निधी मिळाला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून आजतागायत २५ कोटीहून अधिकचा निधी बीड विधानसभा मतदारसंघात आणला. त्यामुळे मतदारसंघातील विकासाची प्रक्रिया गतिमान झाली असून कोट्यवधींची विकासकामे प्रगतीपथावर आहेत. हे सर्व ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्यामुळे शक्य झाले असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले.

### आमदारांना जमले नाही ते योगेश क्षीरसागर यांनी करून दाखविले

बीडच्या स्थानिक आमदाराच्या आमदार फंडाइतका निधी डॉ.योगेशभैयांनी अवघ्या एका वर्षात खेचून आणला. यासोबतच मतदारसंघातील ४० स्मार्ट अंगणवाड्या, ग्रामीण रुग्णालय, पशुवैद्यकीय दवाखाना, सामाजिक सभागृह, सिमेंट रस्ते, नाली, बंधारा, दुरुस्तीची असंख्य सार्वजनिक कामे पूर्णत्वास गेली आहेत. त्यामुळे बीडच्या विकासाचे व्हिजन असलेला नेता म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर यांची प्रतिमा तयार होत आहे.

# केजमधून दलाल हद्दपार करा

**डॉ.अंजलीताई घाडगे:** निवडणूक वातावरण तापले



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मतदार संघाच्या आमदार नुसत्या नावाला असून आमदार एक त्याचे कारभारी दुसरा आणि लाभार्थी तिसरा अशी अवस्था आहे. त्या मुळे आता केज मतदार संघाचे व्यापारी आणि त्यांचे दलाल यांना या निवडणुकीत हाकलून लावा.

राज्याचा विकास करण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला निवडून देण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी गावभेट संपर्क दौऱ्यात केले.केज मतदार संघातून व्यापारी आणि दलाल हद्दपार करा डॉ. अंजलीताई घाडगे पाच वर्षात भाजपचा आमदार कोण ? हे कळले नाही असे अंजली घाडगे यांनी म्हटले आहे तसेच विद्यमान आमदार यांना लोकांच्या भेटीगाठी तर सोडाच साधा सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी असमर्थ ठरले आहेत असे अंजलीताई घाडगे यांनी म्हटले आहे.

# मोफत आरोग्य शिबिरातून दिलासा

**उपक्रम:** जयदत्त क्षीरसागरांच्या संकल्पनेतून नियोजन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे संकल्पनेतून काकू नाना प्रतिष्ठान,आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षिरसागर वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत मा.उपमुख्यमंत्री (गृह /विधी व न्याय)मंत्रालय मुंबई. यांच्या समन्वयातून दिनांक१०ऑक्टोबर २०२४ रोजी बीड तालुक्यातील नागझरी येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हवामानाच्या बदलामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्या विषयी समस्या उद्भवत असून प्रामुख्याने सर्दी,ताप,खोकला,हाडांचे आजार, मणक्याचे आजार,संधिवात,तसेच संसर्गजन्य रोग याबाबत तक्रारी निदर्शनास आल्या. या सामुदायिक आरोग्य कॅम्पच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे मोफत तपासणी करून ई.सी.जी.रक्त, तपासण्या

पान २ वर...

# दोन्ही गडावर जाणाऱ्या भाविकांसाठी अल्पोपहार

**ऋणानुबंध:** डॉ.योगेश,डॉ.सारिकाताई क्षीरसागरांचे नियोजन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगड आणि शिरूर कासार तालुक्यातील नारायणगडावर आज (दि.१२) दसरा मेळाव्यानिमित्त जाणाऱ्या १० हजार भाविकांसाठी अल्पोपहाराची सोय केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, समर्थकांच्या पुढाकारातून हे

पान २ वर...

# दीक्षाभूमीकडे येणाऱ्या अनुयायांकडून टोल घेऊ नका

**ड.प्रकाश आंबेडकर:** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले पत्र




मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिक्षाभूमी नागपूर, बुद्ध लेणी औरंगाबाद, अकोला आणि महाराष्ट्रातील विविध ठिकाणी तथागत गौतम बुद्ध आणि बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी प्रवास करणाऱ्या अनुयायांकडून टोल घेतला जाऊ नये, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी सरकारला केले आहे. तसेच याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने टोल न घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विजयादशमी दिनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौध्द धम्माची दीक्षा घेतली हा दिवस जगभरातील अनुयायांसाठी सन्मानाचा, मुक्तीचा दिवस असल्याचे ड. आंबेडकरांनी म्हटले आहे.ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, दरवर्षीप्रमाणे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त १२ ते १३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान दिक्षाभूमी नागपूर, बौद्ध लेणी औरंगाबाद,

पान २ वर...

# कार्यकर्ता संवाद बैठकीस उपस्थित रहावे

**किशोर भोले:** गेवराईत तालुक्यात होणार बैठक



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदरणीय ॲड बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार प्रदेश अध्यक्षा रेखाताई ठाकूर जिल्हा प्रभारी किसन चव्हाण सर मराठवाडा अध्यक्ष अशोकभाऊ हिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने दिनांक १३/१०/२०२४ रविवार रोजी शासकीय विश्रामगृह गेवराई येथे ठिक

११:०० वाजता कार्यकर्ता संवाद बैठक आयोजित करण्यात आली असून बैठकीच्या निमित्ताने नवनिर्वाचित जिल्हा कार्यकारिणीचा भव्य दिव्य सत्कार होणार आहे कार्यकर्ता संवाद कार्यक्रमासाठी तालुका निरीक्षक धम्मानंदभाऊ साळवे निरिक्षक अर्जून जवंजळ सर निरीक्षक डॉ गणेश खेमाडे सर जिल्हाध्यक्ष अजय नवनाथ सरवदे जिल्हा महासचिव खंडु देवराव जाधव सह नवनिर्वाचित जिल्हा कार्यकारिणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा पदाधिकारी तथा निरीक्षक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत तरी कार्यकर्ता संवाद बैठकीस गेवराई तालुक्यातील सर्व सर्कल प्रमुख सर्व गण प्रमुख,तालुका पदाधिकारी ,शहर कार्यकारिणी, युवक कार्यकारिणी, सम्यक विद्यार्थी आंदोलन, भारतीय बौध्द महासभा,समता सैनिक दल व आजी माजी तालुका पदाधिकारी

पान २ वर...

# परळीमध्ये संधी दिल्यास तयार

**अभिजीत देशमुख:** राष्ट्रवादीत तिकिटासाठी रस्सीखेच



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खा. शरदचंद्र पवार साहेबांनी संधी दिल्यास परळी विधानसभा मतदारसंघातून आपण निवडणूक लढण्यास तयार आहोत असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक नेते तथा महाराष्ट्र शुगर मिल्सचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत देशमुख यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केले. अभिजीत देशमुख हे परळीचे माजी नगराध्यक्ष एन. के. देशमुख यांचे पुतणे आहेत त्यामुळे त्यांचा मतदारसंघात दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांना संधी मिळाल्यास निवडणुकीत नक्कीच चुरस निर्माण होणार आहे. देशमुख यांच्या या घोषणेमुळे शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तिकिटासाठी आता रस्सीखेच वाढल्याचे दिसत आहे.

देशमुख यांच्या गणेशपार भागातील विठाई निवास ह्या त्यांच्या निवासस्थानी शुक्रवारी (दि. ११) ही पत्रकार परिषद झाली. देशमुख म्हणाले, परळीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात त्यांचे काका माजी नगराध्यक्ष के.एन.के. देशमुख (मालक) यांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. परळी पालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध विकास योजना कार्यान्वित केल्या, शासन दरबारी आपले संबंध वापरून त्यांनी शहराच्या विकासासाठी निधी खेचून आणला, परळीचा सर्वांगिण विकास करण्यात स्मृतीशेष एन.के. देशमुख (मालक) यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी परळी शहराच्या विकासासाठी केलेले कार्य परळीकर कधीही विसरू शकनार नाही. स्मृतीशेष एन. के. देशमुख मालकांचा वारसा पुढे चालवण्यासाठी अभिजीत देशमुख यांनी परळीच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला आणी गेल्या दोन

पान २ वर...

# निधी खेचून आणण्याचा धडाका

**धनंजय मुंडे:** ग्रामविकास विभागाकडून शासन निर्णय निर्गमित



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी विविध विभागाच्या मार्फत बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील विकास कामांना निधी खेचून आणण्याचा धडाकाच सुरू केला आहे. ग्रामविकास विभागाच्या संत सेवालाल महाराज बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजनेतून परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील बंजारा/लमाण तांड्यांच्या विकासासाठी नऊ कोटी पन्नास लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून बीड जिल्ह्यातील बहुतांश तांड्यांना सम प्रमाणात निधी देण्यात आला आहे. याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत. नुकतेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून २८ हजार घरकुलांसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

पान २ वर...

**ऋणानुबंध** रतन टाटा हॉल ऑफ फेमच्या निर्मितीचा संकल्प

# पद्मविभूषण रतन टाटांना आदरांजली!



पुणे/ पुण्यभूमी प्रतिनिधी

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणेतर्फे मानवतेचा अद्वितीय विनम्र सेवक व टाटा समूहाचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड, माईर्स एमआयटीचे संस्थापक विश्वस्त प्रा. प्रकाश बी. जोशी, डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, ज्येष्ठ पत्रकार अरूण खोरे, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, आचार्य प्रा. रतनलाल सोनग्रा, डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम.चिटणीस व कुलसचिव गणेश पोकळे उपस्थित होते.प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, मानवतेचा अद्वितीय विनम्र सेवक पद्मविभूषण रतन टाटा यांच्या नावे एमआयटी डब्ल्यूपीयूत विश्वमानव रत्न रतन टाटा हॉल ऑफ फेमची लवकरच निर्मिती करू. रतन टाटा हे नावाप्रमाणेच देशाचे रत्न होते. सचोटी, प्रामाणिकपणा, धडाडी, त्याग, स्नेह, समर्पण, सेवाभाव आणि साधेपणा शिकला पाहिजे. समाजाच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य त्यांनी घालविले. त्यांचा आदर्श व त्यांचे विचार आचरणात आणून कार्य केल्यास त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल. प्रा.प्रकाश बी. जोशी म्हणाले, भारतीय लोक विदेशात जाऊन

पान २ वर...

### रत्न रतन टाटा हॉल ऑफ फेम

या हॉलमध्ये माईर्स एमआयटी ग्रूप ऑफ इन्स्टिट्यूटच्या यशवंतांना वैशिष्ट्यीकृत केले जाईल. ज्यांनी शैक्षणिक, संशोधन, नवकल्पना, शांतीसाठी अध्ययन, क्रीडा, समाजसेवा, कला, व्यवसाय, उद्योजकता आणि इतर क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली .

# आज संपर्क कार्यालयाचे उदघाटन

**आवाहन:** प्रवेश सोहळ्यास उपस्थित रहावे




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते राजेभाऊ फड यांची परळी विधानसभा मतदारसंघात दमदार वाटचाल सुरू आहे. आज विजया दशमीच्या शुभ मुहूर्तावर त्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच अंबाजोगाई रोडवरील संपर्क कार्यालयाचे पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.फौजिया खान यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात मतदारसंघातील अनेकांचा पक्षात जाहीर प्रवेश होणार असून या कार्यक्रमास पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष ॲड. जीवनराव देशमुख, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष वर्षा रायभोळे व शहराध्यक्ष ॲड.कल्पना सतीश देशमुख यांनी केले आहे.

परळी विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेला संपर्क साधता यावा तसेच नागरिकांना आपल्या समस्या घेऊन येता यावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या वतीने परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच परळी – अंबाजोगाई रोडवर संपर्क कार्यालय उभारण्यात आले आहेत. आज शनिवार, दि.१२ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या महिला आघाडीच्या

पान २ वर...